


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026 | रविवार दि. १२ जुलै २०२६

आवृत्ती- पुणे,अहील्यानगर,मुंबई,ठाणे,पालघर,सिंधुदुर्ग,रत्नागिरी




संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ५ | वर्ष : ४ थे | अंक : २१२ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# आषाढी यात्रेसाठी ५ हजार ५०० बसेस सोडणार : परिवहन मंत्री, प्रताप सरनाईक

## ग्रुप बुकींग असल्यास राज्याच्या कोणत्याही गावातून थेट पंढरपूर पर्यंत बस मिळणार

**पंढरपूर :** आषाढी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत असतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्राकाळात ५ हजार ५०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

आषाढी यात्रा नियोजनासाठी चंद्रभागा बस स्थानक,पंढरपूर येथे एस टी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते.यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर, नगराध्यक्षा श्रीमती प्रणिता भालके, प्रांताधिकारी सचिन इथापे, सहा. पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री नेरपगार, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, विभागीय वाहतूक नियंत्रक अमोल गोंजारी व एसटी महामंडळाचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, आषाढी यात्रा कालावधीत पंढरपूरातील विविध बसस्थानकांवर थांबलेल्या बसेसची अंतर्गत व बाह्य स्वच्छता, निर्जंतुकीकरण करावे, आषाढी यात्रेसाठी विशेष बससेवा असा दर्शनी फलक लावण्यात यावा, त्याचबरोबर चालक व वाहक यांच्या आरोग्याच्या वैद्यकीय तपासणीची बसस्थानक परिसरात व्यवस्था करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. परतीच्या प्रवासासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेवून मार्गनिहाय स्वतंत्र रांगा तयार करून नियोजनबद्ध पद्धतीने प्रवाशांना बसेसमध्ये प्रवेश देण्यात यावा तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी प्रवाशांशी सौजन्याने वागावे,अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. या विशेष बस सेवेतही शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार



आहेत. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजना' अंतर्गत मोफत प्रवास, तर महिलांना 'महिला सन्मान योजना' अंतर्गत तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी असे आवाहन परिवहन मंत्री श्री सरनाईक यांनी केले.

मागील वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने ५ हजार १४५ विशेष बसेस चालवून तब्बल २१ लाख ९५ हजार भाविकांची सुरक्षित ने-आण केली होती. यंदा त्याहून अधिक सुक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. एकादशीच्या दिवशी लाखो भाविक परतीच्या प्रवासाला निघत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटीचे ३६ हून अधिक वाहतूक नियंत्रक आणि सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यात येणार आहेत. तसेच वारकरी भाविकांसाठी पंढरपूर व परिसरात चंद्रभागा, भीमा (देगाव), विठ्ठल कारखाना आणि पांडुरंग (आयटीआय महाविद्यालय) अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. या स्थानकांवर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

वारी कालावधीत रात्रंदिवस सेवा बजावणाऱ्या महामंडळाच्या १३ हजार कर्मचाऱ्यांना यामध्ये चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्यासाठी चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वखर्चाने केली आहे.

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली भीमा बसस्थानची पाहणी

आषाढी यात्रा शुद्ध एकादशी २५ जुलै २०२६ रोजी असून, आषाढी यात्रा सोहळ्यासाठी वारकरी- भाविकांची दिवसेंदिवस संख्या वाढत आहे. यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी सुमारे १८ ते २० लाख वारकरी भाविक पंढरपुरात येतात. आषाढी यात्रेसाठी एस.टी ने येणाऱ्या वारकरी भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या अनुषंगाने प्रवासी भाविकांच्या सुविधेसाठी महामंडाळामार्फत पंढरपूर व पंढरपूर परिसरात चार तात्पुरते बसस्थानक निर्माण करण्यात येतात. या अनुषंगाने आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक श्री.विठ्ठल कारखाना, देगाव येथे तात्पुरते भीमा बसस्थानकाची पाहणी केली. यावेळी वारकरी भाविकांच्या सुविधेसाठी उभारण्यात आलेल्या भीमा बसस्थाकावर, सुलभ शौचालय, शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता, आरोग्य सुविधा, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक, सीसीटीव्ही यंत्रणा तसेच सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक आदी बाबतची माहिती घेतली व संबधितांना आवश्यक सुचना त्यांनी यावेळी दिल्या.



## थोडक्यात....

### बंगालच्या उपसागरात रिश्टर स्केलवर ४.५ तीव्रतेचा भूकंप; विशाखापट्टणमपर्यंत जाणवले धक्के



**नवी दिल्ली :** आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यापासून दूर बंगालच्या उपसागरात रविवारी पहाटे ४.५ रिश्टर तीव्रतेचा सौम्य भूकंप झाला. या भूकंपाचे धक्के विशाखापट्टणम शहरातील अनेक भागांत जाणवले. मात्र, या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याची माहिती मिळालेली नाही. दिलासादायक बाब म्हणजे भूकंपाचा परिणाम मर्यादित राहिला आणि कोणतीही मोठी आपत्ती किंवा जनहानी झाली नाही.

### धक्कादायक! होर्मुझमध्ये व्यापारी जहाजावर इराणचा हल्ला; ११ भारतीयांपैकी एक खलाशी बेपत्ता, भारताचा तीव्र निषेध



**नवी दिल्ली :** ओमानच्या किनाऱ्याजवळ होर्मुझ सामुद्रधुनीत सायप्रसच्या ध्वजाखालील 'जीएफएस गॅलेक्सी' या व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्याचा भारताने तीव्र निषेध केला आहे. या जहाजावर ११ भारतीय नागरिक कार्यरत होते. त्यापैकी १० जणांची सुरक्षित सुटका करण्यात आली असून, एका भारतीय खलाशाचा अद्यापही शोध सुरू आहे.

### इंग्लंड आणि झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेसाठी भारतीय संघात बदल



**मुंबई :** इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिका ४-० ने गमावल्यानंतर भारतीय संघात मोठे बदल करण्यात आले आहेत. इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी आणि झिम्बाब्वे दौऱ्यावरील टी-२० मालिकेसाठी भारतीय संघात फेरबदल करण्यात आले आहेत. पण, हे बदल संघाच्या कामगिरीशी संबंधित नसून क्रिकेटपटूंच्या दुखापतींमुळे झाले आहेत. हर्षित राणा आणि वरुण चक्रवर्ती यांना नुकतीच दुखापत झाली असून ते भारताच्या आगामी मालिकेत खेळू शकणार नाहीत. बीसीसीआयने त्यांच्या बदली क्रिकेटपटूंची घोषणा केली आहे.

# जैवतंत्रज्ञान विभाग (डी.बी.टी.), स्टार कॉलेज योजने अंतर्गत अनुदान मंजूर

**जुन्नर/रविंद्र भोर (समर्थ गांवकरी)**

जैवतंत्रज्ञान विभाग,भारत सरकार तर्फे अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय,ओतूर यांस डी.बी.टी. स्टार कॉलेज योजने अंतर्गत अनुदानाचा दुसरा हप्ता मंजूर झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांनी दिली. शैक्षणिक वर्ष २०२४ -२५ मध्ये वाघिरे महाविद्यालय ओतूर यांस जैवतंत्रज्ञान विभाग,भारत सरकार यांचेकडून डी.बी.टी. स्टार कॉलेज योजने अंतर्गत एक कोटी पंचवीस लाख रुपये इतके अनुदान मंजूर करण्यात आले होते.शैक्षणिक वर्ष २०२४ -२५ व २०२५-२६मध्ये सदर अनुदानापैकी महाविद्यालयास रुपये ७८ लाख अनुदान प्राप्त झाले होते.

या अनुदानातून महाविद्यालयात शास्त्र शाखेच्या विविध विभागांमार्फत(रसायन शास्त्र,पदार्थविज्ञान,प्राणिशास्त्र व वनस्पतीशास्त्र विभाग) अनेक विद्यार्थी केंद्रित उपक्रम राबविण्यात आले होते ज्याममध्ये तज्ञ व्याख्याने,कार्यशाळा, शैक्षणिक सहली,मार्गदर्शक व्याख्याने,विज्ञान प्रदर्शन, अतिरिक्त प्रात्यक्षिके,संशोधन प्रकल्प इ.उपक्रम राबविण्यात आले होते.तसेच या अनुदानातून महाविद्यालयाच्या शास्त्र शाखेच्या विविध विभागांमध्ये आवश्यक असणारी शास्त्रीय उपकरणे,रसायने इ.साहित्य खरेदी करण्यात आलेली आहे. या अनुदानातून राबविण्यात आलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांचा मोठा फायदा निश्चितपणे विद्यार्थ्यांना झाल्या चे सांगत विद्यार्थ्यांनी व पालकांनी या बद्दल समाधान व्यक्त केले आहे. आत्तापर्यन्त मिळालेल्या अनुदानाचा महाविद्यालया मार्फत योग्य,व्यवस्थित आणि वेळेत करण्यात आलेला विनियोग यावर जैवतंत्रज्ञान विभाग,भारत सरकार यांनी समाधान व्यक्त करून महाविद्या लयास शुभेच्छा दिल्या आहेत.

# पिचडगाव येथील माऊली आश्रमातील आषाढी पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र माऊली आश्रम पिचडगांव ते श्रीक्षेत्र पंढरपूर पायी दिंडीचे माऊली आश्रमाचे प्रमुख महंत हभप ज्ञानेश्वर महाराज हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी दि.११ जुलै रोजी ज्ञानोबा माऊली तुकाराम असा जयघोष करत पंढरपूरकडे प्रस्थान झाले या दिंडीचे ठिकठिकाणी उत्स्फूर्त स्वागत पिचडगाव व पंचक्रोशीतील वाड्या वस्त्यांच्या भाविकांद्वारे करण्यात आले. दिंडी सोहळ्याचे हे १० वे वर्ष आहे.

समर्थ सद्गुरु किसनगिरी बाबा, वै.ह.भ.प. बन्सी महाराज तांबे नेवासा यांचे कृपाशिर्वादाने, महंत पूज्य श्री भास्करगिरीजी महाराज व महंत स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज, ह.भ.प. देविदास महाराज म्हस्के, महंत उध्दवजी महाराज नेवासेकर यांच्या प्रेरणेने व ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही दिंडी निघाली आहे.



या दिंडीच्या शुभारंभ प्रसंगी त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत स्वामी रमेशानंदगिरीजी महाराज, खडेश्वरी देवस्थानचे महंत गणेशानंदगिरीजी महाराज, विजय महाराज पवार,लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, सीताराम महाराज पठाडे,कल्याण महाराज पवार, समाधान महाराज कन्हेरकर,बदाम महाराज पठाडे, श्रीधर महाराज अनुभुले,ज्ञानेश्वरचे संचालक दत्तूभाऊ काळे,डॉ.शिवाजी शिंदे,उद्योजक शिवाभाऊ पाठक, सरपंच पोपटराव हजारे,माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीपराव सरोदे, भगवानराव शेजुळ, सुरेशनगरचे सरपंच कल्याणराव उभेदळ,अण्णासाहेब वाघुले,अशोकराव साळुंके,विणेकरी बाळू महाराज पवार,सदाशिव महाराज हजारे,बाळू महाराज जाधव यांच्या हस्ते पालखी दिंडीतील पादुकांचे पूजन करण्यात आले.संतसेवक अंबादास गव्हाणे यांनी सूत्रसंचालन केले

यावेळी मृदुंगाचार्य किरण महाराज डीवरे,दत्तात्रय महाराज व्यवहारे,अशोकराव साळुंके,पावन गणपती देवस्थानचे सेवेकरी दत्तात्रय महाराज गायकवाड,कृष्णा महाराज सुसे,लक्ष्मण काशीद,मच्छिंद्र महाराज भोगे, दिनेश महाराज यांच्यासह पिचडगाव येथील विविध संस्थेचे पदाधिकारी ग्राम स्थ मोठ्या संख्येने दिंडीच्या स्वागत प्रसंगी उपस्थित होते.सरपंच पोपटराव हजारे यांनी उपस्थित भाविकांचे आभार मानले

पंढरपूरकडे प्रस्थानासाठी निघालेल्या दिंडीस अंबादास ब्राम्हणे,अशोक निपुंगे, ज्ञानदेव शिंदे,एकनाथ शेंडगे यांच्या वतीने एकादशीच्या निमित्ताने दिंडी वाटेवर शाबुदाना फराळाचे वाटप करण्यात आले.

# पंढरपूरच्या सायकल रिंगण सोहळ्यात अकोलेकरांची छाप

## ३३० किलोमीटरच्या सायकल वारीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश; अगस्ती सायकल क्लबच्या ५५ सायकलिस्टचा सहभाग

**अकोले (समर्थ गांवकरी)**

आषाढी वारीनिमित्त पंढरपूर येथे आयोजित सायकल रिंगण सोहळ्यात अकोले तालुक्यातील अगस्ती सायकल क्लबच्या ५५ सायकलिस्टनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. लाल-भगव्या रंगाच्या आकर्षक जर्सीमुळे अकोलेकरांची उपस्थिती विशेष उठून दिसत होती.

अकोले ते पंढरपूर असा सुमारे ३३० किलोमीटरचा सायकल प्रवास पूर्ण करून हे सायकलिस्ट पंढरपुरात दाखल झाले. या संपूर्ण प्रवासादरम्यान विविध ठिकाणी मुक्काम व विश्रांतीच्या वेळी वृक्षांचे वाटप आणि वृक्षारोपण करण्यात आले. तसेच स्वच्छ वारी, पर्यावरण संवर्धनाची वारी हा संदेश देत स्वच्छता, हरित पर्यावरण आणि सायकल संस्कृतीचा प्रसार करण्यात आला.

रविवारी सकाळी सात वाजता पंढरपूर नगर प्रदक्षिणेला सुरुवात झाली. त्यानंतर राज्यभरातून आलेले सर्व सायकलिस्ट रेल्वे मैदानावर एकत्र जमले. येथे प्रथम पायी चालत आणि त्यानंतर घड्याळाच्या काट्याच्या दिशेने तसेच विरुद्ध दिशेने सायकल चालवत पारंपरिक रिंगण सोहळा पार पडला. या सोहळ्यात महाराष्ट्रातील विविध भागांतून सुमारे चार हजार सायकलिस्ट सहभागी झाले होते.

स्वच्छ भारत, प्रदूषणमुक्त पर्यावरण आणि सुदृढ आरोग्याचा संकल्प व्यक्त करत अगस्ती सायकल क्लबने पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश दिला. विशेष म्हणजे सतरा-अठरा वर्षांच्या युवकांपासून ते सत्तर वर्षांच्या ज्येष्ठ सायकलप्रेमींपर्यंत सर्वांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. श्रद्धा, आरोग्य आणि पर्यावरण यांचा संगम घडविणाऱ्या या उपक्रमात अकोलेकरांच्या सहभागाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले. या सायकलवारीत डॉ.विष्णु बुळे,डॉ दर्शन बंगाळ, राजेंद्र देशमुख,अशोक चौधरी,डॉ शामकांत शेटे,किरण मालुंजकर,अरुण भालेराव,अतुल ढोके,बुधाजी पेढेकर,सखाहारी दाते,साहिल दाते,भाऊसाहेब कासार,वेदांत कासार,उत्तम बनकर,बबन रणपिसे,दिलीप कोकणे,रमेश पुंडे,रावसाहेब वावळे,निवृत्ती चौधरी,राजेंद्र पुंड,निवृत्ती कर्पे ऋषिकेश आरोटे,भास्कर दिघे, जादूगार वसंत आहेर,बालचंद हासे, प्रवीण आंबेकर,धनंजय वाकचौरे,गोरक्षनाथ आवारी






शंकर लांडे,नरेंद्र फटांगरे,रेखा फटांगरे,महेश हासे,अर्जुन भुसारी,वैद्य मॅडम,अभिषेक फापाळे,नरेंद्र नवले,अनुज व्यवहारे,विनायक कदम, नरेंद्र राठोड,कृष्णा साबळे,जया साबळे,मयूर साबळे,योगेश काळे,माधुरी काळे,पेढेकर मॅडम,मुठे साहेब,करण ताठे, डॉ.दिलीप लोहारे,सागर पुंडे,महेश शेटे, जाधव संतोष, अनिल गायकवाड,डॉ. सखाराम घनकुटे, डॉ. सुदाम आरोटे, डॉ. निलेश सहाने, डॉ. अनिल डेरे आदी ५५ सदस्य सहभागी झाले होते.

# पालक-शिक्षक मेळाव्यात इंद्रजीत देशमुख यांना वृक्षभेट

**वृक्षभेटीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश**

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, संगमनेर व संगम नेर तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पालक–शिक्षक मेळाव्यात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा उपक्रम राबविण्यात आला. या प्रसंगी प्रख्यात व्याख्याते, विचारवंत तसेच महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाचे माजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजीत दत्तात्रय देशमुख (काकाजी) यांना पर्यावरणप्रेमी राहुल प्रभाकर राऊत (रा. मवेशी, ता. अकोले) यांनी वृक्षभेट देऊन स्वागत केले. कार्यक्रमाला माजी विधान परिषद आमदार डॉ. सुधीर तांबे यांची प्रमुख उपस्थिती होती. वृक्षभेटीद्वारे उपस्थित पालक, शिक्षक, विद्यार्थी व मान्यवरांमध्ये झाडे लावा, झाडे जगवा हा पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. वाढत्या पर्यावरणीय समस्यांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. पर्यावरणप्रेमी राहुल प्रभाकर राऊत हे अकोले तालुक्यात वृक्षारोपण, जलसंधारण, देशी वृक्ष संवर्धन व पर्यावरण जनजागृतीसाठी सातत्याने कार्यरत असून, विविध सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये मान्यवरांना वृक्षभेट देऊन पर्यावरण संरक्षणाची जनजागृती करत आहेत. या प्रसंगी प्रा. संतोष भालेराव, विनोद भोईर व बाळासाहेब राऊत यांची उपस्थिती होती.






# व्यापारी मंडळाकडून १९ हजार वारकर्यांना महाप्रसाद

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

नगरमध्ये आलेल्या त्र्यंबकेश्वर येथील निवृत्ती महाराज आषाडी वारीला पंढरपूरला जाणाऱ्या पायी दिंडीला मार्केटयार्ड व्यापारी मित्र मंडळच्या वतीने पूर्ण फराळ देण्यात आला गेली १४ वर्षे हा उपक्रम चालू आहे अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष अमोल पोखरणा यांनी दिली.

मार्केटयार्ड मधील सर्व व्यापारी एकत्र येऊन वारकर्यांना आज एकादशी असल्याने फराळ देण्यात आला,यामध्ये उपवासाचे पाच पदार्थ होते. हा पूर्ण फराळ चा लाभ सुमारे १९ हजार च्या वर वारकर्यांनी घेतला. दुपारी १ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यत फराळ वाटप चालू होते, यावर्षी प्रशासनाने उत्तम सहकार्य केले व खुप चांगली व्यवस्था ठेवली त्यामुळे सर्व व्यपाऱ्यानी मनपाचे कौतुक केले. कार्यक्रम यशश्वी करण्यासाठीसर्व मार्केट परिसरातील सर्व व्यापाऱ्यांनी परिश्रम घेतले.





अहिल्यानगर (स. गांवकरी):– डोंगरगण येथे संत निवृत्तीनाथ दिंडीचे सरपंच सर्जेराव मते,जंगले शास्त्री,ग्रामीन पोलीस चे उपअधीक्षक शिरीष वमने ,तहसीलदार ,अधिकारी व ग्रामस्थांनी केले भव्य दिव्य स्वागत व पूजा केली (फोटो– महेश कांबळे,नगर )

# जुन्नरच्या उत्तरेकडील आदिवासी भागात भातरोपे मातीखाली

**जुन्नर/रविंद्र भोर (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्याच्या उत्तरेकडील आदिवासी भागात मुसळधार पावसाने भातशेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.भात खाचरे तुडुंब पाण्याने भरून वाहिल्याने भात रोपे वाहून जाण्यासोबतच काही ठिकाणी भात रोपे मातीखाली गाडली गेली आहेत.तसेच पेर भात खाचरातील माती वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी पुताचीवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र दाभाडे यांनी केली.

मुसळधार पावसामुळे आदिवासी भागातील बहुतांश ठिकाणी रस्ते,पूल यांचे नुकसान झाले आहे.कोपरे,मांडवे,फोफसंडी,जांभुळशी,पुताचीवाडी, मारखुलवाडी, मुथाळने या गावां कडे जाण्यासाठी महत्त्वाचा असलेल्या मुथाळणे घाटात चार ते पाच ठिकाणी दरड कोसळ ल्याची घटना घडली. हा घाट रस्त्याचे नव्याने काम करून रुंदी वाढविली आहे मात्र अनेक ठिकाणी भरावा वाहून गेल्याने हा घाट वाहतुकीसाठी पूर्णतः धोकादायक झाला असून या घाटात सुरक्षेच्या दृष्टीने उपाय योजना करण्याची मागणी कोपरे गावचे ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल कवटे व मांडवे गावचे माजी सरपंच तुकाराम जोशी यांनी केली आहे.फोफसंडी,माळीवाडी, तळमाची,कोपरे,चारमोरी,जोशीवाडी,गावठाण वाडी,मारखुल वाडी या ठिकाणी अतिवृष्टीमुळे भूस्खलन होण्याची शक्यता असल्याने या भागातील नागरिकांना खबरदारी म्हणून सुरक्षित उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी आदिवासी युवक मोर्चाने केली.कोपरे, जांभुळशी,फोफसंडी या परिसरात पावसाने अक्षरशः थैमान घातले.कोपरे येथील जांभुळशी आणि परिसरातील वाडीवस्तीकडे जाणाऱ्या रस्त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तर पाण्याच्या प्रवाहासोबत मोठ्या प्रमाणावर माती वाहून आल्याने अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी पूर्णतः गाडल्या जाऊन नुकसान झाले आहे.





या आदिवासी गावां च्या ओढ्यावरील पुलावरून मोठ्या प्रमाणात पाणी गेल्याने परिसरातील भात शेतीबरोबर सोयाबीन,मिरची,टोमॅटो, फ्लॉवर,भुईमूग,वाटाणा,भात रोप आदींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.बहुतांशी शेतकऱ्यांच्या कांदा चाळीमध्ये पाणी घुसल्याने कांद्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.तसेच अनेक शेतातील जवळपास शंभरहून अधिक वर्षाचे मोठ्या आकाराचे, निलगिरी,हिरड्यांचे,आंब्याचे झाडे वादळी वाऱ्याच्या तडाख्याने कोसळल्याची घटना घडली आहे.

# खरीप हंगामात उत्पादनवाढीसाठी कृषी विभागाच्या शिफारशीनुसार पेरणी करावी



**शिर्डी (समर्थ गांवकरी)**

राहाता तालुक्यातील सर्व सहा मंडळांमध्ये १०० मि.मी. पावसाची नोंद होऊन जमिनीत वापसा स्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर खरीप हंगाम २०२६ मध्ये हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन पिकांचे नियोजन करावे व कृषी विभागाने शिफारस केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून शास्त्रीय पद्धतीने पेरणी करावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे यांनी केले आहे.

राहाता तालुक्यात गतवर्षी ५७ हजार ०८४ हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी झाली होती. त्यामध्ये सोयाबीन २६ हजार २५४ हेक्टर, मका ९ हजार २८५ हेक्टर व कापूस ९ हजार ७०६ हेक्टर क्षेत्राचा समावेश होता. यंदा २५ हजार हेक्टरवर सोयाबीन, ११ हजार हेक्टरवर मका व ९ हजार ६०० हेक्टरवर कापूस लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. उपलब्ध पाणी, जमिनीचा प्रकार, हवामानातील बदल व बाजारपेठेतील मागणी लक्षात घेऊन पिकांची निवड करावी.

पेरणीपूर्वी माती परीक्षण करून मृदा आरोग्य पत्रिकेतील शिफारशीनुसार नत्र, स्फुरद, पालाश, गंधक, झिंक व बोरॉन या अन्नद्रव्यांचा संतुलित वापर करावा. रासायनिक खतांचा अतिरेक टाळून शेणखत, कंपोस्ट, गांडूळखत व जैविक खतांचा वापर वाढवावा. पेरणीसाठी केवळ प्रमाणित व सत्यप्रत बियाण्यांचा वापर करावा. वाणाची निवड करताना उगवणक्षमता, कालावधी व रोगप्रतिकारक क्षमता विचारात घ्यावी. कोरडवाहू क्षेत्रात किमान ७५ ते १०० मि.मी. समाधानकारक पाऊस झाल्यानंतरच घाई न करता पेरणी करावी. शिफारशीनुसार अंतर, खोली व बियाण्याचे प्रमाण ठेवावे. बीजजन्य व जमिनीतून पसरणाऱ्या रोगांपासून संरक्षणासाठी पेरणीपूर्वी प्रथम बुरशीनाशकाची व त्यानंतर रायझोबियम, पीएसबी व ट्रायकोडर्मा या जैविक घटकांची बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे. राहाता तालुक्यात मध्यम ते भारी जमीन असल्याने अतिरिक्त पाण्याचा निचरा, ओलावा संवर्धन व पिकांची एकसमान वाढ यासाठी बीबीएफ पद्धतीचा अवलंब करणे उपयुक्त ठरते.

पिकांच्या वाढीसाठी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाचा अवलंब करून पीक अवशेषांचा वापर करावा व नत्राचा विभागून वापर करावा. कीड व रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिवळे व निळे चिकट सापळे, फेरोमोन सापळे व जैविक कीडनियंत्रणाचा वापर करावा. आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यानंतरच रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करावी. पेरणीनंतर ३० ते ४५ दिवसांच्या कालावधीत तणांचे प्रभावी नियंत्रण करावे.

कृषी यांत्रिकीकरण, सूक्ष्म सिंचन, पीक संरक्षण व जैविक शेतीसह विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर पात्रतेनुसार अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी कृषी सहाय्यक, मंडळ कृषी अधिकारी अथवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही श्री. मोरे यांनी केले आहे.



पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील आमचे दैनिक समर्थ गांवकरी चे प्रतिनिधी दामोदरजी जगदाळे यांच्या मुलीच्या विवाह सोहळ्याप्रसंगी सदिच्छा भेट देऊन राज्य पत्रकार संघाच्या वतीने व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने सत्कार करताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे संजय फुलसुंदर

# बालविवाह रोखण्यासाठी निघोजमध्ये जनजागृती

## स्नेहालयाच्या ‘शुभमंगल सावधान’ पथनाट्याला उत्स्फूर्त प्रतिसाद





**पारनेर (समर्थ गांवकरी)**

मुलगी शिकली, प्रगती झाली’ या विचाराला कृतीची जोड देत, बालविवाहमुक्त समाज घडवण्यासाठी स्नेहालय संस्था संचलित उडान प्रकल्प आणि मुक्तिवाहिनी प्रकल्पाने हाती घेतलेली मोहीम आता लोकचळवळ बनत आहे. नुकतेच निघोज येथे स्नेहालय संचलित ’उडान प्रकल्प’ आणि ’मुक्तिवाहिनी’च्या वतीने नोबेल पुरस्कार विजेत्या मलाला युसुफझाई यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी स्नेहालय संस्थेचे संचालक जॉइस (यूके),विभागाच्या कार्यकारी अधिकारी संगीता सानप, उडान प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रवीण कदम, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष बाबाजी वाघमारे, प्राचार्य मनिषा गाडगे, उपप्राचार्य निर्मला सोबले, जयवंत पुजारी, मेहबूब इनामदार, पुष्पा वराळ , सुनील औटी, बेलोटे सर, काळे सर, भास्कर काकडे, पत्रकार भास्कर कवाद, आनंद भुकन, सागर आतकर ,उडान प्रकल्पाचे निशा वाघ, नेहा वाघ, शशिकांत शिंदे, महेश शिंदे, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी चिमुकल्यांनी सादर केलेल्या ’शुभमंगल सावधान’ या पथनाट्याने उपस्थितांची मने जिंकली असून,बालविवाहासारख्या अनिष्ट प्रथेला मूठमाती देण्यासाठी समाज आता खंबीरपणे पुढे आला आहे.निघोज येथील शाळा, बसस्थानक परिसर आणि मळगंगा मंदिर परिसरात मुलींनी स्वतः पुढाकार घेत बालविवाह प्रतिबंध आणि मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारी रॅली काढली.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे शुभमंगल सावधान’ हे पथनाट्य. विशेष म्हणजे, ज्या मुलींनी स्वतः बालविवाहाच्या संकटाचा सामना केला आणि ज्यांचे बालविवाह संस्थेच्या प्रयत्नांमुळे थांबवण्यात आले, त्याच मुलींनी हे पथनाट्य सादर केले. स्वतःच्या अनुभवातून मांडलेले हे नाट्य उपस्थितांच्या डोळ्यांत अंजन घालणारे ठरले. संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात आतापर्यंत या पथनाट्याचे ३५२ हून अधिक प्रयोग झाले असून, हजारो नागरिकांपर्यंत या माध्यमातून बालविवाहविरोधी संदेश पोहोचवण्यात यश आले आहे.या उपक्रमाच्या यशासाठी निघोजमधील पत्रकार बांधव आणि श्री मुलिकादेवी विद्यामंदिर यांनी दिलेले सहकार्य अत्यंत मोलाचे ठरले. या कार्यक्रमास निघोज परिसरातील सरपंच, शिक्षकवृंद, महिला, विद्यार्थी, पालक आणि प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या मुलींच्या स्वप्नांना बळ देण्यासाठी संपूर्ण गावाने या मुलींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार केला आहे.शेवटी,मुली शिकल्या तर समाज घडेल; चला, त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहूया!असा संदेश देत या जनजागृती कार्यक्रमाची सांगता झाली. या उपक्रमामुळे निघोज परिसरात एक सकारात्मक बदलाची लाट निर्माण झाली असून, बालविवाहाला आळा घालण्यासाठी तरुणाई पुढाकार घेत असल्याचे चित्र आश्वासक ठरत आहे. सूत्रसंचालन मेहबूब इनामदार यांनी केले तर आभार सामाजिक कार्यकर्ते भगवान गायकवाड यांनी मानले.

**महाराष्ट्र शासन**

**ई-निविदा सूचना क्र.८ (द्वितीय वेळ) सन २०२६-२७**

**कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, छत्रपती संभाजीनगर.**

**डॉ. हेडगेवार रुग्णालयाच्या बाजूला, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर. ४३१००५**

दूरध्वनी क्र. : ०२४० २९५२९५५ ई-मेल पत्ता-pbhpdabadgmail.com

कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, छत्रपती संभाजीनगर हे सक्षम कंत्राटदारांकडून खालील नमुद कामांकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

**कामाचे नाव** : १. जलविज्ञान प्रकल्प उपविभाग, नेवासा या उप विभागाच्या कार्यक्षेत्रात जलहवामानशास्त्र विषयक क्षेत्रिय माहिती संकलीत करण्यासाठी मनुष्यबळ पुरवठा (कालावधी ०१/०६/२०२६ ते ३१/०५/२०२७) (सुशिक्षित बेरोजगार अभियंता, अहिल्यानगर जिल्हा साठी राखिव)

**जिल्हा** : अहिल्यानगर

**निविदेची अंदाजित किंमत रुपये** : १.) रुपये : १६,८९,२२१

**ई-निविदा उपलब्ध कालावधी** : दि. १३/०७/२०२६ (सकाळी ११:०० वा.) पासून दि. २०/०७/२०२६ (दुपारी ०३:०० वा.) पर्यंत.

**ई-निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ** : दि. २१/०७/२०२६ (दुपारी ३:०० वा. शक्य असल्यास)

**टिप:**– उपरोक्त निवेदेअंतर्गत जलसामग्री हवामान प्रक्रिया विभाग, नाशिक मार्फत विकसित करण्यात आलेल्या MobileApp MAHA-HP वर पुर्ण कालावधीचा डाटा (आधारसामग्री) विहित कालावधीत प्राप्त झाल्यावरच देयके अदा करण्यात येईल.

खालील ठिकाणी ई-निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे. १) संकेतस्थळ – http://mahatenders.gov.in व www.mahahp.org (सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.) २) कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र. जविप्रऔ/लेखा२/७४८/२०२६

दि.०७/०७/२०२६

**कार्यकारी अभियंता**
**जलविज्ञान प्रकल्प विभाग**
**छत्रपती संभाजीनगर**

**जिमाका / नगर / जाहि /६०/२०२६-२७**

**जाहीर नोटीस**

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामिण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष**

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.**

दुरध्वनी: ०२०-२६१२५७७९ email : ddrpunegramingmail.com

जा.क्र. १४/२०२६-२७ पुणे दिनांक ०७/०७/२०२६/१२९६

फुलसुंदर मार्केट को-ऑप हौसिंग सोसायटी ली.,
पत्ता- स.नं. २९८/७, २९८/८ व २९९/१/१ नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे- ४१०५०४
तर्फे अध्यक्ष – श्री. किशोर पोपटलाल पोखरणा .................... **अर्जदार**

**विरुद्ध**............मे. महावीर डेव्हलपर्स करिता प्रोप्रा./ भागीदार, १) श्री. विराज दत्तात्रय फुलसुंदर (विकासक/जागामालक), २) श्री. जयचंद्र दत्तात्रय फुलसुंदर (विकासक/जागामालक), ३) श्री. सुहास अशोककुमार शहा (विकासक/जागामालक), ४) श्री. पराग अशोककुमार शहा (विकासक/जागामालक), ५) श्रीमती. हर्षलता अशोककुमार शहा (विकासक/जागामालक), ६) श्री. मुन्वर अब्दुल लतीफ शेख (जागा मालक), ७) श्री. संजय शंकर अडसरे (जागा मालक), ८) श्रीमती. लक्ष्मीबाई भ्र. दामाजी फुलसुंदर (जागा मालक) सर्व रा. नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे. ४१०५०४ ............. **जाबदेणार**

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप क्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होण्यासाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. **सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,** सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात **दिनांक २७/०७/२०२६ रोजी दुपारी ४.00 वा** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित राहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहिल्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरून पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक ०७/०७/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

**(प्रकाश ल. जगताप)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पुणे.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने जर्नलिझमच्या विद्यार्थ्यांचा गौरव










**अकोले (समर्थ गांवकरी)**

संगमनेर महाविद्यालयातील 'प्रगत पत्रकारिता अभ्यासक्रमा'चा नुकताच निकाल जाहीर झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. या निकालातील ॲड. राजू खरे व अफसर शेख यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने अकोले येथील विभागीय कार्यलयात पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ विश्वासराव आरोटे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मराठवाडा संपर्कप्रमुख तथा दैनिक समर्थ गांवकरी समुहाचे मानद संपादक कुंडलिक वाळेकर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांच्या यशात पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. संतोष खेडलेकर व विजय पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे देखील विशेषतः आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी पत्रकार मोहन गायकवाड, स्वप्निल शिंदे, वैभव कदम, ईरदम तांबोळी व उज्वला जगताप यांचा सन्मान पत्र गौरव चिन्ह पेन हरीपाठ देऊन सन्मान करण्यात आला व पत्रकार संघाच्या वतीने पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

> पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभआहे. उद्याचा प्रगतीशील समाज घडवण्याचे कार्य हे तरुण पत्रकार करतात. विद्यार्थ्यांना वृत्तलेखन, बातमी कौशल्य, सामाजिक भान याविषयी सखोल प्रशिक्षण सर्वांना भेटले. आज या सर्व विद्यार्थ्यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने सन्मान करण्याचा योग आला. भविष्यात हे विद्यार्थी पत्रकारिता क्षेत्रात उत्कृष्ट काम करतील हिच अपेक्षा.
>
> –डॉ विश्वासराव आरोटे
> महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ. महासचिव

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## श्री सदगुरू शंकर महाराज भजनी मंडळातर्फे वारकऱ्यांना रेनकोट व अल्पोपहाराचे वाटप



**नेवासा (समर्थ गांवकरी)**

आषाढी वारीनिमित्त धनकवडी येथील श्री सदगुरू शंकर महाराज भजनी मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही धनकवडी परिसरात मुक्कामी असलेल्या विविध जिल्ह्यांतील दिंडीतील वारकरी भाविकांना रेनकोट व नाश्ता वाटप करण्यात आला.

अविरत पडणाऱ्या पावसात पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये, या सेवाभावी उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शेकडो वारकरी भाविकांनी या उपक्रमाचा लाभ घेत भजनी मंडळाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या प्रसंगी भजनी मंडळाचे अध्यक्ष निखिल बाबुदादा वाघमारे,चिन्मय भदे,विठ्ठल चव्हाण,गणेश कपिलेश्वर, गौरव आढागळे, तुषार राजपूत,आर्यवीर चव्हाण,सुरज बांदल,हॉटेल उद्योजक अमित शेट्टी,संदीप तरे,धीरज परदेशी तसेच भजनी मंडळाचे सर्व सदस्य, गुरुबंधू आणि मित्रपरिवार उपस्थित होते.

कार्यक्रमाची सांगता हरिनामाच्या गजरात व भजन सेवेत झाली. यावेळी वारकरी सेवा हीच ईश्वर सेवा हा संदेश देत उपस्थितांनी समाजहितासाठी असे सेवाभावी उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

## श्रीराम मित्र मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप !



**वासिंद (समर्थ गांवकरी)**

येथील श्रीराम मित्र मंडळाच्या वतीने विद्या विकास मंडळ संचलित सरस्वती विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. गेल्या २४ वर्षांपासून श्रीराम मित्र मंडळाच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदती बरोबर आरोग्य शिबीर, दहिहंडी उत्सव, क्रीडा, सांस्कृतिक व विविध उपक्रम तसेच इतर गरजू व्यक्तींना मदतीचा हात असे अनेक कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. याच अनुषंगाने येथील सरस्वती विद्यालयातील विद्यार्थ्यांना वह्या, दप्तर व छत्री वाटप करण्यात आले.

सदर, कार्यक्रमावेळी पोलिस निरीक्षक सुनील बच्छाव, विद्या विकास मंडळाचे चेअरमन राजेंद्र भेरे, सचिव रविंद्र शेलार, संचालक अनिल महाजन, मंडळाचे अध्यक्ष अनिल मानिवडे, जेष्ठ नागरिक अनंता शेलार, प्राचार्य वासुदेव भोईर, पर्यवेक्षक संजीव जाधव, श्रीराम मित्र मंडळाचे मार्गदर्शक पदाधिकारी महादेव वाढविंदे, दत्तात्रय देवरे, चंद्रकांत सोनार, शांतकुमार लच्छाणे, चिंतामण पवार, बी.के जाधव आदीजण उपस्थित होते.

## पुष्पावती विद्यालय,डिंगोरे येथे जागतिक लोकसंख्या दिन साजरा



**जुन्नर/रविंद्र भोर (समर्थ गांवकरी)**

ग्रामविकास मंडळ ओतूर संचलित पुष्पावती विद्यालय, डिंगोरे येथे ११ जुलै रोजी जागतिक लोकसंख्या दिन विविध जनजागृतीपर उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

कार्यक्रमात विज्ञान विषयाचे शिक्षक वैभव देशमुख यांनी जागतिक लोकसंख्या दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की,वाढत्या लोकसंख्येमुळे संसाधनांवर ताण,आरोग्य व शिक्षण क्षेत्रावरील वाढता भार तसेच पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन लोकसंख्या नियंत्रण आणि शाश्वत विकासाला प्राधान्य देणे आवश्यक आहे.११ जुलै १९८७ रोजी जगाची लोकसंख्या पाच अब्ज (५०० कोटी) झाली होती. या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र संघाने ११ जुलै हा दिवस 'जागतिक लोकसंख्या दिन' म्हणून घोषित केला.देशमुख यांनी पुढे सांगितले की, सध्या भारताची लोकसंख्या सुमारे १४१ कोटी असून देशात सोळावी जनगणना सुरू आहे. जनगणनेच्या माध्यमातून लोकसंख्या,शिक्षण,स्त्री–पुरुष समानता,दरडोई उत्पन्न आदी महत्त्वपूर्ण बाबींची माहिती उपलब्ध होणार असून त्या आधारे प्रभावी धोरणे व विकासात्मक उपाययोजना राबविणे शक्य होईल. भारताची लोकसंख्या ही केवळ आव्हान नसून योग्य शिक्षण,कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यास ती देशासाठी मोठी मानवी संपत्ती ठरू शकते, असेही त्यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमाची माहिती मुख्याध्यापक शरद माळवे यांनी दिली.कार्यक्रमाच्या नियोजना साठी किसन भतांबरे,दत्तात्रय घोलप,मंगेश कोंडार,रतिलाल बागुल,दिनेश पाटील,अनुराधा नरवडे,दीपा सावंत,सिंधू गोल्हार व शिवाजी उकिरडे यांनी सहकार्य केले.

# वाळूच्या बातम्यांच्या आडून खंडणीचा डाव? कोपरगाव तालुक्यात 'डिजिटल' पत्रकारांच्या नावाने वसुलीचे रॅकेट?

**कोपरगाव/सिध्दार्थ मेहेरखांब (समर्थ गांवकरी)**

कोपरगाव तालुक्यात वाळू वाहतुकीच्या नावाखाली एका शेतकऱ्याला कथितरित्या ब्लॅकमेल करून पैशांची मागणी केल्याचा अत्यंत गंभीर प्रकार समोर आला आहे. स्वतःला पत्रकार आणि गोदावरी बचाव कृती समितीचा सदस्य म्हणवणाऱ्या एका तोतया पत्रकाराविरोधात सांगवी भुसार येथील शेतकरी अजय किसन जाधव यांनी थेट कोपरगाव पोलीस ठाण्यात धाव घेत लेखी फिर्याद दाखल केली असून संबंधित स्वयंघोषित पत्रकार विरोधात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणावरून आता तथाकथित डिजिटल पत्रकारांच्या वाढत्या सुळसुळाटाचा आणि त्यांच्याकडून होणाऱ्या ब्लॅकमेलिंगचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

फिर्यादी अजय जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, कोळगाव थडी येथील मतीन बाबुलाल शेख याने गेल्या काही दिवसांपासून त्यांना सातत्याने फोन व व्हॉट्सअॅप कॉल करून लक्ष्य केले. तुझे वाळू वाहतुकीचे फोटो आणि व्हिडिओ माझ्याकडे आहेत. तुझ्याविरोधात तहसीलदारांकडे तक्रार करीन, बातम्या लावीन, अशी भीती दाखवून संशयिताने २० हजार रुपयांची मागणी केली. धक्कादायक बाब म्हणजे, कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी मागितलेल्या या २० हजार रुपयांच्या रकमेसाठी आरोपीने २० शेळ्या असा सांकेतिक शब्द वापरल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

जाधव यांनी पैसे देण्यास नकार देताच, संबंधित व्यक्तीने सोशल मीडियावर त्यांच्याविरोधात बातम्या प्रसारित करण्यास सुरुवात केली. त्यानंतरही दबाव तंत्र सुरूच ठेवत, आता तुला पैसे द्यावेच लागतील, नाहीतर तुझ्यावर कारवाई करीन. तुझा ट्रॅक्टर पलटी करून टाकू किंवा तुझ्यावर हल्ला घडवून आणू, अशी थेट जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप तरुण शेतकऱ्याने केला आहे. या सर्व संभाषणांचे कॉल रेकॉर्डिंग आपल्याकडे असल्याचा दावा फिर्यादीने केला असून पोलिसांनी तपास सुरु केला आहे.

या घटनेच्या निमित्ताने कोपरगाव तालुका आणि परिसरात सध्या गल्लोगल्ली सुरू झालेल्या कथित YouTube न्यूज चॅनेल्सचा आणि पोर्टलचा काळा चेहरा समोर आला आहे. कोणतीही अधिकृत पार्श्वभूमी, पत्रकारितेचे नियम माहीत नसलेले अनेक जण हातात मोबाईल आणि गळ्यात ओळखपत्र अडकवून स्वतःला पत्रकार' म्हणवून घेत आहेत. काहींनी तर प्रेस नावाचे बोगस ओळखपत्र विक्रीचा धंदाच सुरू केला आहे. त्यामाध्यमातून अधिकारी, व्यावसायिक, शेतकरी आणि सर्वसामान्यांना किरकोळ कारणावरून किंवा खोट्या बातम्यांची भीती दाखवून हे कथित पत्रकार जाळ्यात ओढतात. कॅमेरा आणि सोशल मीडियाच्या ताकदीचा गैरवापर करून 'बातमी लावतो' अशी धमकी देणे आणि पडद्यामागून तोडपाणी करणे, हा काहींचा मुख्य व्यवसाय बनला आहे.अशा तोतया आणि ब्लॅकमेलर्समुळे अहोरात्र प्रामाणिकपणे काम करणाऱ्या आणि समाजाला न्याय मिळवून देणाऱ्या खऱ्या, अधिकृत पत्रकारांची नाहक बदनामी होत आहे.

वाळूविषयक बातम्यांच्या माध्यमातून दबाव टाकून पैशांची मागणी झाल्याचा हा आरोप आता पोलीस तपासाच्या केंद्रस्थानी आहे. या प्रकरणातील सत्यता पोलीस तपासानंतर समोर येईलच; मात्र अशा प्रकारे पत्रकारितेच्या आडून खंडणी मागणाऱ्या प्रवृत्तींचा वेळीच बंदोबस्त करणे गरजेचे झाले आहे. जर कोपरगाव तालुका किंवा परिसरात कोणत्याही तोतया पत्रकाराने, धीर्ढीलश चॅनेलच्या प्रतिनिधीने तुम्हाला बातमीची किंवा कारवाईची धमकी देऊन पैशांची मागणी केली, तर अशा ब्लॅकमेलिंगला अजिबात बळी पडू नका. अशा लोकांविरोधात तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात ऑडिओ/व्हिडिओ पुराव्यांसह तक्रार नोंदवा, असे आवाहन कोपरगाव तालुका पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी केले आहे.

# वन महोत्सवानिमित्त वृक्ष संवर्धन विषयावर चित्रकला स्पर्धा उत्साहात



**पाथर्डी/राजेंद्र चव्हाण (समर्थ गांवकरी)**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री भवानी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळीमानूर, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर येथे वन महोत्सवानिमित्त वृक्ष संवर्धन या विषयावर चित्रकला स्पर्धेचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले.

स्पर्धेपूर्वी विद्यार्थ्यांना चित्रकला शिक्षक श्री निलेश गणगले यांनी वृक्ष संवर्धनाचे महत्त्व, पर्यावरण संरक्षणाची आवश्यकता तसेच प्रभावी चित्रकला सादरीकरणाविषयी मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी वृक्षांचे महत्त्व, जैवविविधतेचे संवर्धन, जलसंधारण आणि हरित पर्यावरणाचा संदेश देणारी आकर्षक व कल्पक चित्रे साकारली. विद्यार्थ्यांच्या चित्रांमधून पर्यावरणाविषयीची जागरूकता, सर्जनशीलता आणि सामाजिक बांधिलकी स्पष्टपणे दिसून आली. या उपक्रमाबद्दल राज्याचे निसर्ग सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे राज्याध्यक्ष श्री प्रमोद दादा मोरे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष श्री बाळासाहेब डोंगरे, महिला जिल्हाध्यक्ष श्रीमती लतिका ताई पवार, जिल्हा कार्याध्यक्ष सौ. छाया ताई राजपूत तसेच जिल्हा उपाध्यक्ष तथा विद्यालयाचे प्राचार्य श्री देविदास सोनटक्के यांनी या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करून सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

# सह्याद्री विद्यालय ब्राम्हणवाडा येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ उत्साहात संपन्न!

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या पुरस्कारांचेही विद्यार्थ्यांना वितरण!











**ब्राम्हणवाडा (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथील अगस्ति एज्युकेशन संस्थेच्या सह्याद्रि माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणवंत विद्यार्थी गुणगौरव समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या समारंभात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने विद्यार्थ्यांना विशेष पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गावकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभर विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक, सामाजिक व प्रोत्साहनपर उपक्रम सातत्याने राबविले जातात. या उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळत असल्याबद्दल उपसरपंच सुभाष गायकर यांनी डॉ. आरोटे यांचे विशेष आभार व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी श्री अगस्ति एज्युकेशन संस्थेचे कार्याध्यक्ष श्री शिरीषजी नाईकवाडी, श्री सतीशजी नाईकवाडी,ब्राम्हणवाडा गावचे उपसरपंच सुभाष गायकर, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी आरोटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सचिन आरोटे, माजी उपसरपंच भारत आरोटे, पोलिस पाटील शिवाजी हांडे, ड. के. बी. हांडे, माजी सरपंच देवराम गायकर, सागर गायकर, करंडी गावचे माजी सरपंच चंद्रकांत गोंदके, सौ. शारदाताई गायकर, शालुबाई कोंडे, उद्योजक प्रकाश शेठ भळगट, जनार्दन हासे सर, अरुण कोते सर, तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ड. के. बी. हांडे होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत शिक्षणासोबतच संस्कार, शिस्त आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण परिश्रम, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर भविष्यातही यशाची नवी शिखरे गाठावीत, असा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयातील शिक्षकांनी उत्कृष्टरीत्या केले. समारंभाचे सूत्रसंचालन प्रभावी पद्धतीने पार पडले असून गोर्डे सर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचा आनंद साजरा करणारा हा समारंभ उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

# अगस्ती महाराज आश्रम ते पंढरपूर पायी पालखी सोहळ्यात वारकऱ्यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचा सेवाभावाचा हात!

## रेनकोट, हरिपाठ पुस्तिका व प्रसादाचे वाटप; डॉ. विश्वासराव आरोटे यांनी दिल्या शुभेच्छा!















अकोले (समर्थ गांवकरी)

**अकोले तालुक्यातील श्री क्षेत्र अगस्ती महाराज आश्रम येथून पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या पायी पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांसाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत वारकऱ्यांना रेनकोट, हरिपाठ पुस्तिका आणि प्रसादाचे वाटप करण्यात आले.**

यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी वारकऱ्यांशी संवाद साधत पंढरपूरच्या पवित्र वारीसाठी मनः पूर्वक शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना डॉ. आरोटे म्हणाले, महाराष्ट्राची संत परंपरा ही जगाला दिशा देणारी आहे. वारकरी संप्रदायाने शेकडो वर्षांपासून भक्ती, समता, मानवता आणि सेवाभावाचा संदेश समाजाला दिला आहे. आषाढी वारी ही केवळ धार्मिक यात्रा नसून श्रद्धा, संस्कृती आणि एकतेचा महासोहळा आहे. पांडुरंगाच्या नामस्मरणात चालणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याच्या सेवेत सहभागी होणे हे आमचे भाग्य आहे. ऊन, वारा, पाऊस यांची पर्वा न करता विठ्ठलाच्या दर्शनासाठी चालणाऱ्या वारकऱ्यांची निष्ठा प्रेरणादायी आहे. त्यांच्या प्रवासात थोडीशी मदत करता आली, याचा आम्हाला आनंद आहे. पत्रकारिता ही केवळ बातम्यांपुरती मर्यादित नसून समाजसेवेचेही प्रभावी माध्यम आहे. विठ्ठल-रखुमाई सर्वांना सुख, शांती आणि समाधान देवो, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

या प्रसंगी अगस्ती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष के. डी. धुमाळ, पायी पालखी सोहळ्याचे अध्यक्ष ह.भ.प. राजेंद्र महाराज देशमुख, विश्वस्त दीपक म हाराज देशमुख, गणेश महाराज वाकचौरे, विणेकरी गंगा बाबा वाकचौरे उपस्थित होते.

तसेच महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, अकोले तालुका अध्यक्ष अशोक उगले, तालुका उपाध्यक्ष जगन्नाथ आहेर, कळस गावचे सरपंच राजेंद्र गवांदे, सोनेरी विश्वास आरोटे.सुगावचे माजी सरपंच सुनील देशमुख, विनेश देशमुख तसेच संघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित होते.

वारकऱ्यांच्या सेवेसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने सामाजिक बांधिलकी जपत भक्ती, सेवा आणि मानवतेचा सुंदर संदेश समाजापुढे ठेवला.

# पारनेर शहराच्या विकासात लोकप्रतिनिधी खोडा घालण्याचे काम करतात : माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत चेडे

## नगरपंचायतच्या पदाधिकाऱ्यांवरही डागली तोफ; रस्ते, पाणी योजना आणि शहर विकासावर परखड भूमिका
## पारनेर शहरातून जाणाऱ्या रस्त्या संदर्भात ही व्यक्त केले परखड मत



पारनेर (समर्थ गांवकरी)

**पारनेर नगरपंचायतीचे माजी उपनगराध्यक्ष तथा शहर विकास आघाडीचे प्रमुख चंद्रकांत चेडे यांनी पारनेर शहरातील विविध विकासकामे, देवी भोयरे फाटा ते खडकी या रस्त्याचे काम, पाणी योजना, नगरपंचायतीची भूमिका तसेच स्थानिक आणि वरिष्ठ लोकप्रतिनिधींच्या कार्यपद्धतीवर परखड भाष्य करत अनेक मुद्द्यांवर थेट टीका केली. पारनेर येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी शहराच्या विकासाला राजकारणाच्या आड येऊ देऊ नये, असे स्पष्ट मत व्यक्त केले.**

चंद्रकांत चेडे म्हणाले की देवी भोयरे फाटा ते खडकी या दरम्यान पारनेर शहरातून जाणाऱ्या रस्त्याचे काम काही काळ का थांबले हे त्या पुढाऱ्यांनाच माहिती असेल, त्या खोलात मला जायचे नाही, असे सांगत चेडे यांनी रस्त्याचे काम सुरू व्हावे म्हणून पारनेरकरांनाच आंदोलन करावे लागल्याची खंत व्यक्त केली. रस्ता रोको आंदोलनानंतर अधिकाऱ्यांनी काम सुरू करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर आमदार काशिनाथ दाते, खासदार निलेश लंके व सुजित झावरे तसेच इतर राजकीय नेत्यांनी नगरपंचायतीमध्ये बैठका घेतल्या. मात्र सर्व लोकप्रतिनिधी स्वतः च्या राजकारणासाठी पारनेर शहरवासीयांना वेठीस धरण्याचे काम करत असून त्यामुळे शहर विकासापासून वंचित राहत असल्याचा घनाघात त्यांनी केला.

चंद्रकांत चेडे पुढे म्हणाले गावातील काही लोक  हे राज्य आणि केंद्र स्तरावर काम करणाऱ्या वरिष्ठ व्यक्तींना गावाच्या विकाससंदर्भात माहिती देतात, मात्र त्याचे परिणाम प्रत्यक्षात दिसून येत नाहीत, असेही ते म्हणाले. गेल्या साडेतीन ते चार वर्षांपूर्वी पारनेर नगरपंचायतीत राष्ट्रवादीची सत्ता आली, मात्र शहराची महत्त्वाची पाणी योजना अजूनही कुठे अडकली आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. पाणी योजनेच्या फाईलचा मंत्री आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे आवश्यक तो पाठपुरावा होताना दिसत नाही. नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि नगरसेवक यांनी त्यांच्या अधिकारांचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे, असे मतही चेडे यांनी व्यक्त केले. पारनेर शहर कोणत्या दिशेने जात आहे, स्थानिक नेतृत्व पुढे का येत नाही किंवा त्याला पुढे येऊ दिले जात नाही का, याचाही विचार करण्याची गरज असल्याचे चेडे म्हणाले. शहरातील रस्त्यांच्या प्रश्नावर वरिष्ठ राजकीय नेते त्यांच्या राजकारणासाठी नागरिकांना वेठीस धरत असल्याचा आरोप त्यांनी केला आणि याबाबत शहरवासीयांनी गांभीर्याने विचार करण्याचे आवाहन केले.

निधीच्या मुद्द्यावर बोलताना चंद्रकांत चेडे यांनी खासदार निलेश लंके, आमदार काशिनाथ दाते आणि सुजित झावरे पाटील यांच्यावरही निशाणा साधला. खासदार निलेश लंके दीडशे कोटी रुपये, आमदार काशिनाथ दाते अठरा कोटी रुपये आणि सुजित झावरे पाटील आठ कोटी रुपये निधी पारनेर शहरासाठी आणल्याचा दावा करतात. मात्र हा निधी पारनेर नगरपंचायतीच्या नावाने आणि शहराच्या लोकसंख्येच्या निकषावर मिळणारा निधी असल्याचे सांगत तो पारनेरकरांचाच अधिकार असल्याचे माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत खेडे स्पष्ट केले.

विकासकामांच्या उद्घाटन आणि भूमि पूजन फलकांवर स्थानिक नगराध्यक्षांचे फोटो नसल्याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली. माजी नगराध्यक्ष विजू औटी, माजी नगराध्यक्ष नितीन अडसूळ किंवा सध्याच्या नगराध्यक्ष डॉ. विद्याताई कावरे यांच्या छायाचित्रांना विकासकाम ांच्या फलकांवर स्थान मिळत नसल्याचे त्यांनी नमूद केले. खासदार निलेश लंके यांच्या विकास कामांच्या फलकावर नगराध्यक्षांचे फोटो दिसत नाही, तसेच सुजित झावरे पाटील यांनी शहराचा डीपीआर मंजूर झाल्यानंतर लावलेल्या शुभेच्छा फलकांवरही नगराध्यक्षांचे छायाचित्र नव्हते, असे त्यांनी सांगितले. आमदार काशिनाथ दाते यांनी शहरात उभारण्यात आलेल्या लाईट पोलवर स्वतः चे फोटो लावले. नगराध्यक्ष विरोधात असतील तर त्यांच्यासोबत असलेल्या नगरसेवकांचे फोटो तरी लावण्यास काय अडचण होती, असा सवाल त्यांनी केला. शहराच्या विकासासाठी प्रत्यक्ष योगदान नसतानाही फलकबाजी करण्यात काही जण पुढे असल्याची टीकाही चंद्रकांत चेडे यांनी केली.

स्थानिक पातळीवरील काही नागरिक आणि पुढाऱ्यांवर टीका करताना त्यांनी उपरोधिक शब्दांत प्रतिक्रिया दिली. पारनेर शहरातील काही लोकांनी वरिष्ठ पुढाऱ्यांच्या दावणीला शहर बांधून ठेवले आहे का, असा प्रश्न उपस्थित करत हे लोक नेमके सुशिक्षित आहेत की आदिवासी, हेच समजत नसल्याची कोपरखळी चंद्रकांत चेडे यांनी लगावली.

देवी भोयरे फाटा ते खडकी या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामाबाबत बोलताना चंद्रकांत चेडे यांनी सध्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे सांगितले. मात्र रस्ता तयार करताना स्थानिक बाजारपेठेच्या अडचणी आणि भविष्यातील वाहतुकीच्या गरजा लक्षात घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. अतिक्रमण पूर्णपणे हटवून रस्ता रुंद करावा, मात्र रस्त्याच्या मध्यभागी डिव्हायडर उभारू नये, कारण ते शहरातील व्यापार न वाढण्यास कारणीभूत ठरू शकते अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली.

बायपासच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी सध्या पारनेर शहराला बायपासची गरज नसल्याचे म्हटले. डीपीआरमध्ये शहरासाठी रिंगरोडचा समावेश असून भविष्यात कालांतराने बायपास उभारावा लागणारच आहे. मात्र सध्या शहराची बाजारपेठ वाढविणे आणि पारनेरला नवी ओळख निर्माण करून देणे अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. रस्त्याच्या कामाबाबत प्रशासकीय अधिकारी स्थानिकांना विश्वासात घेत नाहीत, अशी काही नागरिकांची तक्रार असल्याबाबत पत्रकारांनी विचारले असता चेडे यांनी नगराध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांनी स्वतःचे अधिकार वापरणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रशासकीय अधिकारी विश्वासात घेत नाहीत, हे म्हणणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नगरपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांकडे सर्व अधिकार आहेत. त्यामुळे प्रत्येक प्रश्नासाठी आमदार किंवा खासदारांना बोलावण्याची आवश्यकता नसून स्थानिक स्वराज्य संस्थेनेच पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. पारनेर येथे पत्रकारांशी संवाद साधताना चंद्रकांत चेडे यांनी रस्ते, पाणी योजना, शहर विकास, स्थानिक नेतृत्व आणि लोकप्रतिनिधींची भूमिका या सर्व विषयांवर परखड मतप्रदर्शन करत पारनेरच्या विकासाबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले.

### रस्ता रुंद करा; पण डिव्हायडर टाळा

देवी भोयरे फाटा ते खडकी रस्त्याचे काम सध्या प्रगतीपथावर असल्याबद्दल समाधान व्यक्त करताना चेडे यांनी काही सूचना मांडल्या. स्थानिक बाजारपेठेचा विचार करून रस्त्यालगतची अतिक्रमणे पूर्णपणे हटवून रस्ता अधिक रुंद करण्यात यावा. मात्र शहरातील मुख्य बाजारपेठेत मध्यभागी डिव्हायडर उभारू नये. डिव्हायडरमुळे व्यापारी वर्ग आणि ग्राहकांना अडचणी निर्माण होऊ शकतात तसेच बाजारपेठेच्या विस्तारावरही त्याचा परिणाम होऊ शकतो, असे माजी उपनगरध्यक्ष चंद्रकांत चेडे यांनी सांगितले.

### इतर गावांत बैठका नाहीत, मग पारनेरमध्येच का?

रस्त्याचे काम बेल्हे, आळकुटी, देवी भोयरे फाटा, वडझिरे, चिंचोली आदी गावांमधूनही सुरू आहे. त्या गावांमध्ये अशा बैठका घेण्याची वेळ आली नाही, मग पारनेर शहरातच वारंवार बैठका का घेतल्या जात आहेत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. पारनेर शहरातील नागरिक विकासकामांना विरोध करत नाहीत, मग शहरालाच वेठीस धरण्याचे राजकारण का केले जाते, असा प्रश्नही माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत चेडे यांनी पत्रकार परिषदेमधून उपस्थित केला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### दिवंगत श्री अजितदादा पवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ "जयपूर फूट महाशिबिर"

पुणे (स. गांवकरी) : दिवंगत श्री अजितदादा पवार यांच्या ६७ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ "मोफत जयपूर फूट अभियान – नवी चाल, नवा आत्मविश्वास" या उपक्रमांतर्गत दिव्यांग बांधवांसाठी मोफत कृत्रिम हात-पाय (जयपूर फूट) वितरण महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे महाशिबिर दि. २२ ते ३० जुलै २०२६ या कालावधीत गुरुनानक दरबार गुरुद्वारा परिसर, कॅम्प, पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. या महाशिबिराचे आयोजन लायन्स क्लब ऑफ पुणे सुप्रीम, रामेश्वर मणियार आर्किटेक्ट्स, द अंबादास खोबरागडे आर्ट फाउंडेशन, इंडियन रेड क्रॉस सोसायटी (पुणे व अकोला) तसेच गुरुनानक मेडिकल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे. या महाशिबिराला महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राजी पवार यांनी उपस्थित राहण्यास सहमती दर्शविली आहे. अभियानाचे अध्यक्ष आर्किटेक्ट रामेश्वर मणियार, सह-अध्यक्ष दिलीपसिंह गोसल तसेच लायन्स क्लब ऑफ पुणे सुप्रीमच्या अध्यक्षा आर्टिस्ट रजनी अंबादे यांनी त्यांची भेट घेऊन या सामाजिक उपक्रमाची माहिती दिली. महाशिबिरात आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू दिव्यांग बांधवांना पूर्णपणे मोफत कृत्रिम पाय (जयपूर फूट), कृत्रिम हात तसेच विविध आवश्यक सहाय्यक उपकरणे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. दिव्यांगांना स्वावलंबी बनविणे, त्यांना सन्मानाने जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या आत्मविश्वासाला नवी दिशा देणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

### तैवान सादर करणार परिवर्तनाला गती देणारी अत्याधुनिक तंत्रज्ञान समाधान




पुणे (स. गांवकरी) : भारतातील उत्पादन (मॅन्युफॅक्चरिंग) क्षेत्र स्मार्ट फॅक्टरी आणि शाश्वत उत्पादन प्रक्रियेच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असताना, तैवान एक्सलन्स ऑटोमेशन एक्स्पो 2026 मध्ये तैवानमधील अत्याधुनिक औद्योगिक तंत्रज्ञान भारतीय उद्योगांसमोर सादर करणार आहे. यामुळे भारतीय उत्पादकांना बुद्धिमान (इंटेलिजंट) उत्पादन व्यवस्थेच्या भविष्यातील तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. 22 ते 25 जुलै दरम्यान मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित ऑटोमेशन एक्स्पो 2026 मधील तैवान एक्सलन्स पॅव्हेलियनमध्ये 22 पुरस्कारप्राप्त तैवानी ब्रँड्सची नवकल्पना प्रदर्शित केली जाणार आहे. या प्रदर्शनात AI एज कॉम्प्युटिंग, रोबोटिक्स आणि स्मार्ट ऑटोमेशन तसेच औद्योगिक उपकरणे आणि घटक (Industrial Equipment & Components) या क्षेत्रांतील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश असेल. उत्पादकांची उत्पादकता वाढवणे, कार्यक्षमतेत सातत्य राखणे आणि अधिक शाश्वत उत्पादन व्यवस्था उभारणे यासाठी उपयुक्त तंत्रज्ञान येथे सादर केले जाईल.

### संत तुकाराम महाराज पालखीचे परशुराम वाडेकर यांनी केले सारथ्य



पुणे (स. गांवकरी) : आषाढी वारीसाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांनी आज पहाटे पुण्यातून पंढरपूरकडे प्रस्थान केले. उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी आषाढी वारीनिमित्त निवडुंगा विठोबा मंदिर, भवानी पेठ येथे जगद्गुरू संत तुकोबारायांच्या पालखीचे दर्शन घेतले, याप्रसंगी पहाटे सहा वाजता उपमहापौर वाडेकर यांच्या हस्ते काकड आरती संपन्न झाली. यानंतर जगद्गुरू संत तुकोबारायांच्या पादुकांचे दर्शन घेत त्यांनी सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. तसेच भवानी पेठ ते पुलगेट दरम्यान पालखी रथाचे सारथ्य वाडेकर यांनी केले. यावेळी देहू संस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ह.भ.प. जालिंदर मोरे महाराज यांच्या शुभहस्ते उपमहापौर परशुराम वाडेकर यांचा सन्मान करण्यात आला. तसेच पालखी सोहळ्याच्या परंपरेनुसार पालखीचे स्वारस्य (मानाचा सन्मान) उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. या प्रसंगी माजी नगरसेवक विशाल धनवडे, देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त, ट्रस्टचे पदाधिकारी, वारकरी, भाविक तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उपमहापौर यांनी संत श्रेष्ठ ज्ञानदेव महाराज पालखीचे पालखी विठोबा मंदिर भवानी पेठ येथे दर्शन घेतले यावेळेस संत ज्ञानेश्वर महाराज ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी उपमहापौर वाडेकर यांचा सन्मान केला.



### संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज पालख्यांचे जल्लोषात स्वागत

पुणे (स. गांवकरी) : आषाढी वारीनिमित्त संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे डेक्कन जिमखाना येथील गुडलक चौकात प्रभात तरुण मित्र मंडळाच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी पालखीसोबत आलेल्या वारकरी बंधू-भगिनींसाठी मंडळाच्या वतीने राजगिरा लाडू, चिक्की, बिस्किटे, बटाटा चिवडा आदी खाद्यपदार्थांसह पावसापासून संरक्षणासाठी रेनकोट (प्लास्टिक इरले) यांचे वाटप करण्यात आले. या सेवाभावी उपक्रमाला वारकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमात मंडळाचे कार्याध्यक्ष अपूर्व सोनटक्के, अध्यक्ष बाळासाहेब गिराम, उत्सव प्रमुख सिद्धार्थ भोंडे, पियुष भळगट, प्रिया रानडे, किमया ढेकणे, सुवर्णा ऋषी, वृंदा बाम, सुनीता जेऊर, प्रिती फडके, वृंदा गिराम, वैशाली जोगळेकर, योगेश जोगळेकर, समर ठकार, प्रणव बाम, मिलिंद टकले, पुष्कर लिमये, सुषमा कार्ले, पूर्वा गोडबोले आणि प्राजक्ता जोगळेकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते सक्रियपणे सहभागी झाले होते. या उपक्रमामुळे वारकऱ्यांच्या सेवेसोबतच अध्यात्मिक आणि सकारात्मक उर्जेचा अनुभव मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. प्रभात तरुण मित्र मंडळ सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबवत असून, ही संकल्पना आमदार सिद्धार्थ शिरोळे आणि नगरसेवक सुनील पांडे यांच्या प्रेरणेतून साकारण्यात आली. या प्रसंगी भाजपच्या नगरसेविका निवेदिता एकबोटे, नगरसेवक अपूर्व खाडे तसेच सरचिटणीस अर्चना सोनावणे यांनी उपस्थित राहून उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

# बीएलओसह क्षेत्रीय कामांतून दिव्यांगांना वगळा

## प्रलंबित मागण्या तातडीने सोडवा : राज्याध्यक्ष बाळासाहेब सोनवणे

- राज्य अपंग संघटनेचे जिल्हाधिकारी हेमांगी पाटील यांना निवेदन

नाशिक : (स. गांवकरी)

राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या विविध न्याय्य व प्रलंबित मागण्यांसाठी दि. ९ जुलै २०२६ रोजी झालेल्या राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनाला महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेने जाहीर पाठिंबा दर्शविला. आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवल्यानंतर संघटनेचे राज्याध्यक्ष बाळासाहेब सोनवणे सर यांच्या नेतृत्वाखाली दिव्यांग शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या न्याय्य व प्रलंबित मागण्यांचे सविस्तर निवेदन अप्पर जिल्हाधिकारी हेमांगी पाटील यांना सादर करण्यात आले.




निवेदनामध्ये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ ची प्रभावी अंमलबजावणी, दिव्यांग अधिकारी, कर्मचारी व शिक्षकांना बीएलओ, एसआयआर, जनगणना, निवडणूक तसेच इतर क्षेत्रीय स्वरूपाच्या कामांतून वगळणे, ४ टक्के आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी, पदोन्नतीतील अनुशेष भरणे, सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती, शिक्षक पात्रता परीक्षा (TET) मध्ये गुणांची सवलत, बदल्यांमध्ये प्राधान्य, विशेष वाहतूक भत्ता तसेच दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या विविध सेवाविषयक प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढण्याची मागणी करण्यात आली.

"महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेने सादर केलेल्या मागण्या अत्यंत महत्त्वाच्या असून त्यांची सकारात्मक दखल घेण्यात येईल. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ तसेच शासनाच्या प्रचलित नियमांनुसार संबंधित मागण्यांवर आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी संबंधित स्तरावर पाठपुरावा करण्यात येईल. दिव्यांग अधिकारी, कर्मचारी व शिक्षकांना न्याय, समान संधी आणि सन्मानपूर्वक कार्यपरिसर मिळणे ही शासनाची जबाबदारी आहे. प्रशासन नागरिकांच्या न्याय्य व कायदेशीर मागण्यांबाबत नेहमीच संवेदनशील राहून नियमानुसार कार्यवाही करेल."

**- श्रीमती हेमांगी पाटील, अप्पर जिल्हाधिकारी नाशिक**

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी हेमांगी पाटील यांनी निवेदनाची सकारात्मक दखल घेत, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ तसेच शासनाच्या प्रचलित नियमांनुसार संबंधित मागण्यांवर नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन दिले.यावेळी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष सतीश लाड,सहसचिव सोमा भालनोर,प्रसिद्धीप्रमुख प्रदीप महाले, विभागीय कोषाध्यक्ष सुरेश कापडणीस, विलास पाटील, तालुका सचिव सुनील निकम, गणेश क्षीरसागर, गणू बागुल तसेच संघटनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

दिव्यांगांचा सन्मान म्हणजे सामाजिक न्यायाचा सन्मान. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ हा केवळ कायदा नसून दिव्यांगांच्या सन्मानाने जगण्याच्या अधिकाराची हमी आहे.दिव्यांग अधिकारी, कर्मचारी व शिक्षकांना त्यांच्या क्षमतेच्या पलीकडील क्षेत्रीय कामांतून मुक्त करून समान संधी ४% आरक्षण,पदोन्नती आणि सेवाविषयक सर्व न्याय्य हक्क तातडीने मिळणे आवश्यक आहे शासनाने दिव्यांगाच्या प्रश्नांवर संवेदनशीलतेने निर्णय घ्यावेत ही आमची अपेक्षा आहे. संघटना दिव्यांगांच्या न्याय हक्कासाठी लोकशाही व कायदेशीर मार्गाने सातत्याने संघर्ष करत राहील.

**- बाळासाहेब सोनवणे सर, राज्य अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना**

## तालुकाध्यक्षपदी प्रकाश बस्ते, सचिवपदी भाऊसाहेब गांगुर्डे

कनाशी : (स. गांवकरी)

वंचित बहुजन आघाडीची कळवण तालुक्यातील बहुप्रतिक्षित कार्यकारिणी अखेर जाहीर झाली. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि कळवण नगरपंचायत निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सामाजिक बांधिलकी जोपासणारी मजबूत टीम उभी करण्यात आली आहे. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात नेहमीच अग्रेसर आणि संघर्षशील नेतृत्व म्हणून ओळख असलेले प्रकाश बस्ते यांची तालुकाध्यक्षपदी तर ज्येष्ठ कार्यकर्ते भाऊसाहेब गांगुर्डे यांची सचिवपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष या अँड प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार, प्रदेश सचिव जितरत्न पटाईत जिल्हाध्यक्ष दिपक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यकारिणी अंतिम करण्यात आली.



प्रकाश बस्ते तालुकाध्यक्ष, भाऊसाहेब गांगुर्डे सचिव, तुषार गांगुर्डे महासचिव , संजय केदारे, दादाजी बच्चाव, शशिकांत निरभवणे, राजेंद्र गांगुर्डे, राहुल गांगुर्डे उपाध्यक्ष सोशल मिडिया प्रमुख प्रदीप बच्चाव, योगेश बस्ते, संघटक शिरिष आहिरे, बापू पवार, विकी बोरसे निवड जाहीर होताच तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी एकत्र येत फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष साजरा केला.

## दैनिक समर्थ गांवकरीच्या पाठपुराव्याला यश

पावणे, खैरणे व महापे एमआयडीसीतील धोकादायक खड्डे व चेंबरांवर अखेर कार्यवाही!





नवी मुंबई : (स. गांवकरी)

पावणे एमआयडीसी, खैरणे एमआयडीसी आणि महापे एमआयडीसी परिसरातील धोकादायक खड्डे, उघडी चेंबर्स व नाल्यांमुळे वाहनचालक, पादचारी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे येथे कधीही मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता व्यक्त केली जात होती.

या गंभीर समस्येची दखल घेत दैनिक समर्थ गांवकरीचे मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे यांनी सातत्याने वृत्तांकन करून तसेच खड्ड्यात बसून आंदोलन आणि उघड्या चेंबरची प्रतीकात्मक पूजा करून एमआयडीसी प्रशासन, नवी मुंबई महानगरपालिका आणि संबंधित ठेकेदारांचे लक्ष वेधले. त्यांच्या या अनोख्या आंदोलनामुळे हा प्रश्न सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला.

दैनिक समर्थ गांवकरीने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत संबंधित यंत्रणांनी पावणे, खैरणे आणि महापे एमआयडीसी परिसरातील खड्डे बुजविणे, धोकादायक चेंबर्स सुरक्षित करणे तसेच नाल्यांच्या दुरुस्तीची कामे हाती घेतली. त्यामुळे परिसरातील नागरिक, वाहनचालक आणि कामगारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या कार्यवाहीमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त करत दैनिक समर्थ गांवकरी आणि त्यांचे मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे यांनी जनहितासाठी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे कौतुक केले. जनतेच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडून प्रशासनाला कार्यवाहीस भाग पाडण्याचे काम दैनिक समर्थ गांवकरीने पुन्हा एकदा प्रभावीपणे करून दाखवले आहे.

## जय जगन्नाथाच्या जयघोषात गुरूवारी यात्रोत्सव

गुरुवारी रथयात्रा, हजोरो भाविकांची उपस्थिती : महंत डॉ. भक्तीचरणदासजी महाराजांची माहिती



नाशिक : (स. गांवकरी)

सालाबादप्रमाणे यंदाही मोठया उत्सहात भव्य-दिव्य स्वरुपात शहरात भगवान जगन्नाथ रथ यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी (दि.16) सकाळी दहा वाजता जुना आडगांव नाका येथील पंचमुखी हनुमान मंदिरापासून प्रस्थान होइल. तत्पूव सकाळी आठ वाजता भगवान श्रीची पूजा, आरती, श्रुंगार करुन भगवान श्रीचे रथात आगमन होऊन रथयात्रेस प्रारंभ होणार असल्याची माहिती श्री जगन्नाथ पुरी रथ यात्रा उत्सव समितीचे प्रमुख डॉ. महंत श्री भक्तीचरणदास महाराज यांनी दिली. पंचमुखी हनुमान मंदिरात शुक्रवारी (दि.10 श्री जगन्नाथ रथोत्सव सोहळयाच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात होते. महंत भक्तीचरणदास महाराज रथयात्रेविषयी बोलत देत होते. यावेळी रथ यात्रेचे अध्यक्ष नागेश चव्हाण, स्थायी सभापती तथा कार्याध्यक्ष मछिंद्रा सानप, सचिव हर्षद बेळे, जनसंपर्क प्रमुख शशी हिरवे, मंदिर ट्रस्टी मधुसूदन काबरा, बाळासाहेब पाठक, नरहरी उघलमुघले, सचिन लाटे, रथसजावट करणारे सुनिल घुमरे, छावा भारत क्रांती मिशन समन्व्यक विलास पांगरकर आदी उपस्थित होते. पंचवटीश्री जगन्नाथपुरी रथयात्रा उत्सव समितीतर्फे श्री जगन्नाथ रथोत्सव सोहळ्यानिमित्ताने 29 जुलै पर्यत पंचमुखी हनुमान मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महंत भक्तीचरणदास महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी (दि. 15) तपोवनातील आठवण लॉन्स येथे रथ प्रतिष्ठा, हवन व आरती होणार आहे. गुरुवारी रामतीर्थ गोदावरी सेवा समितीची महाआरती होइल, त्यानंतर शुक्रवारी सायंकाळी सातला हभप प्रेरणा बेळे यांचे नारदीय कीर्तन, सरळ चांडक माहेश्वरी यांचे सुंदरकांड, पंचमुखी सुंदरकांड यांचे भजन, महष चित्रपट संस्थेतर्फे धार्मिक व सामाजिक लघुपट प्रदर्शन, पुष्पांजली महिला भजनी मंडळातर्फे संगीतमय सुंदरकांड, मंगलाताई दाते संचलित स्वरसाधना ग्रुप नाशिकरोड, श्री बालाजी फाउंडेशन महिला व आरोही भजनी मंडळातर्फे भजन, रामनाम संगीत साधना ग्रुपतर्फे सुरेंद्र जालिहालकर यांचा गीतरामायण कार्यक्रम, मुक्तानंद भजनी मंडळातर्फे भजन, स्वरसाधना ग्रुपतर्फे भक्तिगीते व भावगीते कार्यक्रम, भक्तीरसधारा ग्रुपतर्फे 108 श्री हनुमान चालीसापाठ, सु-संस्कृती फाउंडेशनचा भावगीते व भक्तीगीतांचा कार्यक्रम 29 जुलै पर्यत होणार आहे.

### रथ यात्रेचा असा असेल मार्ग

रथ पंचमुखी हनुमान मंदिर, जुना आडगाव नाका, गणेशवाडी, गाडगे महाराज पूल, नेहरू चौक, मेनरोड, रविवार कारंजा, होळकर पूल, मालेगाव स्टँड, पंचवटी कारंजा, शिवाजी चौक, सीतागुंफा, काळाराम मंदिर, नागचौक, कृष्णनगर येथून येऊन हनुमान मंदिर येथे समारोप होईल.



## शिक्षण, संस्कार आणि सहकार्याचा अनोखा संगम

डांग : गुजरात : (स. गांवकरी)

तेजस्विनी संस्कृतीधाम, वासुरणा संचलित तसेच आदिजाती विकास विभाग, गांधीनगर मान्यता प्राप्त शिवाश्रय तेजस्विनी छात्रालयात शिक्षण, संस्कार आणि सहकार्याचा सुंदर त्रिवेणी संगम अनुभवायला मिळाला. या प्रसंगी अनाविल सैयरसखा चॅरिटेबल ट्रस्ट, सुरत यांच्या प्रणेता विभूतीबेन देसाई आणि त्यांच्या संपूर्ण सहकारी टीमने ब्रह्मवादिनी पूज्य हेतल दीदी यांच्या सान्निध्यात चालणाऱ्या छात्रालयात राहणाऱ्या ५० बालिकांना जीवनावश्यक वस्तूंचे दान केले. यामध्ये पेट्या, दप्तर, छत्र्या, कटलरी साहित्य, इंडोर गेम्स, कपडे आदी उपयुक्त वस्तूंचा समावेश होता. कार्यक्रमादरम्यान पूज्य हेतल दीदी यांनी पाहुण्यांचे पारंपरिक पद्धतीने पुष्पाऐवजी पुस्तक आणि खेस देऊन स्वागत केले. त्यानंतर छात्रालयातील मुलींनी प्रार्थना, स्वागतगीत आणि आकर्षक डांगी लोकनृत्य सादर करून उपस्थितांचे मन जिंकले.

# वसंतराव नाईक जयंतीनिमित्त शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम

## शेती समृद्धी आणि स्वयंपूर्ण रोजगारासाठी वसंतराव नाईक यांचे योगदान प्रेरणादायी – अजित पाटील

### पाल येथे कृषीदिन उत्साहात

रावेर : (स. गांवकरी)

रावेर तालुक्यातील पाल येथे हरितक्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांनी शेतीच्या आधुनिकी करणासह ग्रामीण भागातील स्वयंपूर्ण रोजगाराला चालना देण्याचे ऐतिहासिक कार्य केले. शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा, शेतीपूरक व्यवसायांना प्रोत्साहन मिळावे आणि ग्रामीण विकासाला गती मिळावी, यासाठी त्यांनी दूरदृष्टीने अनेक योजना राबवल्या. त्यांचे कार्य आजही राज्यातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन सातपुडा विकास मंडळाचे सचिव अजित पाटील यांनी केले.

हरितक्रांतीचे शिल्पकार स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त सातपुडा विकास मंडळ संचलित कृषि विज्ञान केंद्र, पाल येथे 'कृषी दिनाचे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने संत सेवालाल महाराज सभागृहात परिसरातील शेतकऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. वसंतराव नाईक आणि संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर सातपुडा विकास मंडळाचे सचिव अजित पाटील, माजी सरपंच अर्जुन रतन जाधव, गोमती बारेला यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश महाजन यांनी केले.




प्रशिक्षण कार्यक्रमात विषय विशेषज्ञ राकेश कापगते यांनी शेतकऱ्यांना शेतीसोबत पशुपालनासारखे जोडधंदे करणे काळाची गरज असल्याचे सांगितले. पावसाळ्यात जनावरांची विशेष काळजी घेणे, गोठ्याची नियमित स्वच्छता राखणे, वेळेवर लसीकरण करणे तसेच पशुधनाचा विमा उतरविणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी मार्गदर्शनात स्पष्ट केले. गृहविज्ञान विशेषज्ञ भाग्यश्री चौधरी यांनीही शेतकरी कुटुंबांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त माहिती देत विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास धनसिंग पवार, कारणसिंग मागो पवार, रघुनाथ चव्हाण, प्रमोद भंगाळे, दशरथ पवार, गणेश पवार, करणसिंग जाधव, थावरू पवार, अभेराम पवार, श्रावण पवार तसेच बंजारा युवा संघाचे प्रवीण चव्हाण, सोहनसिंग चव्हाण, गोरेलाल राठोड यांच्यासह परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौरभकुमार गडाख यांनी केले, तर आभार प्रदर्शन दिनेश चव्हाण यांनी मानले.

# थोडक्यात पण महत्वाचे




## ॲम्पियरआवर एनर्जीचा भारतातील स्मार्ट ऊर्जा साठवण उत्पादनात विस्तार

पुणे (स. गांवकरी) : बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टीम (BESS) क्षेत्रातील आघाडीची फुल-स्टॅक सोल्यूशन्स कंपनी ॲम्पियरआवर एनर्जीने आज पुण्यातील चाकण येथे आपल्या नव्या BESS उत्पादन व इंटिग्रेशन केंद्राचे उद्घाटन केले. या अत्याधुनिक केंद्रामध्ये 'मेक इन इंडिया' अंतर्गत तयार होणाऱ्या कॅबिनेट व कंटेनराइज्ड बॅटरी DC-AC ब्लॉक्सचे इंटिग्रेशन करून ते युटिलिटी-स्केल तसेच कमर्शियल आणि इंडस्ट्रियल (C&I) क्षेत्रांसाठी विकसित केले जाणार आहे. हा प्लॅटफॉर्म हार्डवेअर-ॲग्नॉस्टिक आर्किटेक्चर, कंपनीची मालकीची Energy Management System (EMS), सबसिस्टम इंजिनिअरिंग आणि प्रगत सुरक्षा डिझाइन यामधील ॲम्पियरआवरच्या कौशल्याचा AH-Suite (AmpereHour Factory Suite) या डिजिटल फॅक्टरी गुणवत्ता व्यवस्थापन आणि उत्पादन चाचणी प्लॅटफॉर्मशी संगम घडवतो. त्यामुळे प्रत्येक प्रणालीची संपूर्ण ट्रेसेबिलिटी, कार्यक्षमतेची पडताळणी आणि उत्पादन केंद्रापासून प्रत्यक्ष वापरापर्यंतचा प्रवास अधिक वेगवान व विश्वासार्ह होतो.




## देवरुख येथे जिल्हास्तरीय तायक्वांदो फाईट स्पर्धेचा उत्साहात शुभारंभ

देवरूख (स. गांवकरी) : संगमेश्वर तालुका तायक्वांदो अकॅडमी व देवरुख तायक्वांदो क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने, रत्नागिरी तायक्वांदो स्पोर्ट्स असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित जिल्हास्तरीय तायक्वांदो फाईट स्पर्धा २०२६ चे उद्घाटन देवरुख येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या उद्घाटन समारंभास आमदार शेखर निकम, रवींद्रजी माने (माजी पालकमंत्री व राज्यमंत्री), माजी रत्नागिरी जिल्हा परिषद अध्यक्ष रोहनजी बने, देवरुख नगराध्यक्ष मृणाल शेट्ये, देवरुख पंचायत समिती सभापती शर्वरी वेल्हे, उपसभापती प्रफुल्ल बाईत, स्मिता लाड, डेपो मॅनेजर मधाळे मॅडम, रूपाली कदम, यशवंत गोपाळ, प्रफुल्ल भुवड, दत्ता भस्मे, रामूशेठ पंदेरे, आदिती लोध, व्यंकटेश करारा, राजू वनकुद्रे, शशांक घडशी, अभिजीत शेट्ये, मोहन हजारे, बाळू शेठ ढवळे, बाळा पंदेरे, पंकज पुसाळकर, बंधू सुर्वे, आंबेकर मॅडम, पूर्वा पवार, उत्तम पवार, संदीप जागुष्टे, समीर राजवाडे, अकॅडमी व क्लबचे पदाधिकारी, प्रशिक्षक, पंच, पालक, खेळाडू, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्व उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून खेळाडूंना शुभेच्छा देत, क्रीडासंस्कृतीचा विकास, शिस्त, मेहनत आणि सातत्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. उद्घाटनप्रसंगी आमदार शेखर निकम यांनी सांगितले की, "खेळ हा केवळ पदक जिंकण्याचा मार्ग नसून तो व्यक्तिमत्त्व घडविणारा संस्कार आहे. तायक्वांदोमुळे शिस्त, आत्मविश्वास, संयम आणि संकटांचा सामना करण्याची ताकद निर्माण होते. ग्रामीण भागातील खेळाडूंमध्ये मोठी क्षमता असून योग्य प्रशिक्षण, सातत्यपूर्ण सराव आणि जिद्दीच्या बळावर ते राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर निश्चितच यश मिळवू शकतात. प्रत्येक स्पर्धेकडे विजयाइतकाच अनुभव मिळवण्याची संधी म्हणून पाहा आणि क्रीडाभावना जपत सर्वोत्तम कामगिरी करा.

## एसटी चालक यांच्याकडून जेष्ठ नागरिक कुमकर व्यक्तीस दुखापत

शिवनेरी (स. गांवकरी) : कोळवाडी गावच्या हद्दीत शुक्रवार दि. १० रोजी एस टी बस स्टॉप जवळ दु. १२ : ३० वा . सुमारास एसटी चालकांकडून जेष्ठ नागरिक रामभाऊ चिमाजी कुमकर वय ६५ वर्षे या व्यक्तीस मोठी दुखापत झाली आहे . याबाबत सविस्तर माहिती अशी आहे , विनायक रामभाऊ कुमकर रा. कोळवाडी यांनी ओतूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली की , कुमकर ही ज्येष्ठ नागरिक व्यक्ती मोटार सायकल नंबर एम एच १४ डब्लु ६४०६ स्वतः ओतुर बाजुकडे घेवुन जात असताना त्यांना पाठीमागुन एस टी बस नंबर एम एच २० बि एल ३९५४ या वरील चालक सुनिल आत्माराम घुले रा . जामखेड , ता . जामखेड , जि . अ.नगर यांने त्याचे ताब्यातील एस टी बस हि हयगयीने ,अविचाराने व रहदारीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून माझे वडीलांच्या मोठया दुखापतीस कारणीभुत ठरला . मोटार सायकल नंबर एम एच १४ डब्लु ६४०६ हिचे नुकसानीस कारणीभुत झाला आहे . सदर अपघातामध्ये नवनाथ एकनाथ कुमकर यांचे हाताला सुध्दा जबर मार लागला आहे. याबाबत एसटी चालक घुले यांच्या विरुध्द पो.स्टे. गु.र.नं. १९४ / २०२६ बि एन एस २०२३ चे कलम २८१ , १२५ , ( ऐ ), १२५ ( बि ), ३२४ ( २ ) मोटर वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पो हवा बांबळे करीत आहे.

## दुर्घटना ग्रस्तांच्या कुटुंबीयांची आमदार निरंजन डावखरे यांची भेट



ठाणे (स. गांवकरी) : कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार तथा भाजपा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस ॲड. निरंजन डावखरे यांनी आज ठाण्यातील आझाद नगर परिसरातील मद्रासी चाळ येथे काल घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर घटनास्थळी भेट देऊन संपूर्ण परिस्थितीची पाहणी केली. यावेळी दुर्घटनेत मृत्यू झालेल्या १२ वर्षीय बालकाच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले तसेच जखमींच्या प्रकृतीची माहिती घेतली. ही चाळ सुमारे २५ ते ३० वर्षे जुनी असून, पहिल्या मजल्यावरील गॅलरीचा भाग अचानक कोसळल्याने ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेत एका निष्पाप बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. घटनास्थळी पाहणीदरम्यान आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी ठाणे महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती काळे यांच्याशी दूरध्वनीद्वारे सविस्तर चर्चा करून दुर्घटनेची संपूर्ण माहिती घेतली. जखमींना तातडीने सर्वोत्तम वैद्यकीय उपचार मिळावेत, मृत बालकाच्या कुटुंबाला शासनाकडून योग्य ती आर्थिक मदत द्यावी तसेच या दुर्घटनेची सखोल चौकशी करून जबाबदारांवर आवश्यक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली. यावेळी परिसरातील धोकादायक आणि जीर्ण इमारतींचे तातडीने संरचनात्मक लेखापरीक्षण (Structural Audit) करून आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी, जेणेकरून भविष्यात अशा दुर्घटना टाळता येतील, अशीही भूमिका त्यांनी मांडली.

# संपूर्ण नाशिक जिल्ह्यात शिवसेना स्टाईलने आक्रमक आंदोलन उभारणार

### शिवसेना जिल्हाप्रमुख निवृत्ती पा जाधव : शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर 'लष्करी सराव' शिक्का; नाशिक जिल्ह्यात संतापाची लाट

- १५ गावांतील जमिनींवर नोंद करण्याचे आदेश
- व्यवहार, कर्ज व शेतीच्या भवितव्याबाबत शेतकरी चिंतेत



बेलगाव कुऱ्हे, नांदूरवैद्य, टाकेद खुर्द, अधरवड, बेलगाव तऱ्हाळे, सोनाशी, अडसरे, बारशिंगवे, समनेरे, घोटी खुर्द, टाकेद बुद्रुक, धामणगाव, नांदगाव बुद्रुक, साकूर आणि मालुंजे. स्थानिक शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ही अधिसूचना जुनी असली तरी आता अचानक जमिनींवर अशा प्रकारच्या नोंदी करण्याची घाई का केली जात आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शासनाने हा निर्णय त्वरित मागे घ्यावा, अन्यथा आक्रमक आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

"शेतकऱ्यांच्या जमिनींवर सक्तीने लष्करी सरावाचा शिक्का मारण्याचा प्रकार अत्यंत अन्यायकारक आहे. प्रशासनाने हा निर्णय तातडीने रद्द करावा. अन्यथा उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने इगतपुरी तालुक्यासह संपूर्ण नाशिक जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडले जाईल. शेतकऱ्यांच्या हक्कांवर कुठलाही आघात आम्ही सहन करणार नाही. शेतकऱ्यांच्या न्यायासाठी शिवसेना रस्त्यावर उतरून संघर्ष करेल."

- निवृत्ती जाधव, जिल्हाप्रमुख, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) – नाशिक जिल्हा

इगतपुरी : (स. गांवकरी)

इगतपुरी तालुक्यातील १५ गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनींवर 'मॅन्यूव्हर्स फील्ड फायरिंग अँड आर्टिलरी प्रॅक्टिस अॅक्ट-१९३८' अंतर्गत लष्करी सरावासाठी अधिसूचित क्षेत्र असल्याची नोंद सातबाऱ्यावर करण्याचे आदेश तहसीलदार अभिजित बारवकर यांनी दिल्याने नाशिक जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. देवळाली येथील मुख्यालय आर्टिलरी स्कूलच्या पत्रानुसार आणि महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील अधिसूचनेचा संदर्भ देत ही प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, यामुळे हजारो शेतकऱ्यांच्या जमिनींवर भविष्यात विविध निर्बंध येण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यात शिवसेना उभाठाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा जिल्हाप्रमुख निवृत्ती जाधव यांनी दिला आहे. तहसील कार्यालयाकडून संबंधित तलाठ्यांना अधिसूचित गट व सर्व्हे क्रमांकांच्या ७/१२ उताऱ्यावर "This Sector is Notified for Field Firing and Artillery Practice" अशी नोंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या नोंदीमुळे जमिनीच्या खरेदी-विक्री, बँकेकडून कर्जासाठी तारण तसेच इतर महसुली व्यवहारांवर परिणाम होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांमध्ये मोठी अस्वस्थता निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, अनेक पिढ्यांपासून कसत असलेल्या जमिनींवर आता लष्करी सरावाचा शिक्का बसणार असल्याने भविष्यात मालकी हक्क, विकासकामे आणि आर्थिक व्यवहार अडचणीत येऊ शकतात. आधीच धरणे, महामार्ग, विविध विकास प्रकल्प आणि भूसंपादनामुळे इगतपुरी तालुक्यातील शेतकरी त्रस्त असताना आता नव्या नोंदीमुळे त्यांच्या चिंतेत भर पडली आहे. शासकीय आदेशानुसार नांदगाव बुद्रुक, साकूर दुमाला, मालुंजे यांसह बेलगाव कुऱ्हे, नांदूरवैद्य, टाकेद खुर्द, अधरवड, बेलगाव तऱ्हाळे, सोनाशी, अडसरे, बारशिंगवे, समनेरे, घोटी खुर्द, टाकेद बुद्रुक आणि धामणगाव या गावांतील अधिसूचित गट क्रमांकांवर ही नोंद करण्यात येणार आहे. दरम्यान, ही अधिसूचना जुनी असली तरी आता अचानक सातबाऱ्यावर नोंद करण्याची घाई का करण्यात येत आहे, असा सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. आधीच विविध विकास प्रकल्पांमुळे शेतकरी अडचणीत असताना या नव्या निर्णयामुळे त्यांच्या हक्कांवर गदा येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासनाने हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अन्यथा इगतपुरी तालुक्यासह संपूर्ण नाशिक जिल्ह्यात व्यापक आंदोलन छेडले जाईल, असा इशारा विविध राजकीय पक्ष आणि शेतकरी संघटनांनी दिला आहे.

## 'मित्रा'कडून १६ कोटींचा निधी

- स्थानिक माशांचे संरक्षण व मच्छीमारांच्या उपजीविकेला मिळणार बळ

सोलापूर : (स. गांवकरी)

उजनी धरणातील जैवविविधतेचे संवर्धन, स्थानिक माशांच्या प्रजातींचे संरक्षण आणि मच्छीमारांच्या उपजीविकेला चालना देण्यासाठी 'मित्रा' संस्थेकडून 16 कोटी रुपयांचा निधी जिल्हा प्रशासनाला उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात उजनी धरणासंदर्भातील विविध प्रश्नांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, वन विभागाचे अधिकारी, बीएनएचएस ट्रस्टचे डॉ. उन्मेश काटवटे, मत्स्य व्यवसायिक भरत मालव आणि मत्स्य व्यवसाय विभागाचे अधिकारी उपस्थित होते. प्रवीणसिंह परदेशी यांनी सांगितले की, उजनी धरणात वाढलेल्या आफ्रिकन कॅटफिश (मांगूर) आणि सकरमाऊथ माशांमुळे स्थानिक माशांच्या अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. या आक्रमक प्रजाती जैवविविधतेसाठी गंभीर धोका ठरत असून त्यांच्या बीज उत्पादनावर बंदी आहे. त्यामुळे स्थानिक माशांच्या बीज उत्पादनाला प्रोत्साहन देण्याबरोबरच मच्छीमारांचे जनजागरण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी सांगितले की, 16 कोटी रुपयांच्या निधीतून स्थानिक माशांचे संवर्धन व प्रजनन केंद्र, तसेच मच्छीमारांच्या उपजीविकेला पूरक विविध प्रकल्प राबविण्यात येणार आहेत.

बैठकीत बीएनएचएस ट्रस्टचे डॉ. उन्मेश काटवटे यांनी सादर केलेल्या अभ्यासानुसार, गेल्या 30 ते 40 वर्षांत उजनी धरणातील 30 ते 35 स्थानिक माशांच्या प्रजाती कायमच्या नष्ट झाल्या असून सुमारे 40 प्रजाती नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर आहेत.

## ५० खाटांचे स्वतंत्र स्त्री रुग्णालय तातडीने उभारण्याची मागणी

- आ. जितेश अंतापूरकर यांची आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे पाठपुरावा

बिलोली : (स. गांवकरी)



देगलूर विधानसभा मतदारसंघाचे आ. जितेश रावसाहेब अंतापूरकर यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाशजी आबिटकर यांची भेट घेऊन देगलूर (जि. नांदेड) येथे ५० खाटांचे स्वतंत्र स्त्री रुग्णालय मंजूर करण्यात यावे तसेच त्यासाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी ठोस मागणी केली.

यावेळी आ. अंतापूरकर यांनी देगलूर परिसरातील महिलांना भेडसावणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांची सविस्तर माहिती आरोग्यमंत्री यांना देत, संबंधित प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित असून, तो विशेष बाब म्हणून तातडीने मंजूर करून निधी उपलब्ध करून देण्याची विनंती यावेळी त्यांनी केली.

या मागणीसाठी यापूर्वीही आ.अंतापूरकर यांनी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला असून,राज्याचे तत्कालीन सार्वजनिक आरोग्यमंत्री राजेश टोपे यांना १५ फेब्रुवारी २०२२ रोजी तसेच तत्कालीन आरोग्यमंत्री तानाजीराव सावंत यांना २० जानेवारी २०२३ रोजी पत्रव्यवहार करून देगलूर येथे स्वतंत्र स्त्री रुग्णालयाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली होती.

त्या पत्रव्यवहाराचाही संदर्भ देत यावेळी पाठपुरावा आ.अंतापूरकर यांच्याकडून करण्यात आला. देगलूर हे महाराष्ट्र, तेलंगणा आणि कर्नाटक या तीन राज्यांच्या सीमेवरील महत्त्वाचे शहर असून, भौगोलिकदृष्ट्या मोठ्या तालुक्याचे केंद्र आहे. या परिसरातील नागरीक विविध आरोग्य सेवांसाठी देगलूरवर अवलंबून आहे. दररोज मोठ्या संख्येने गरीब, गरजू आणि ग्रामीण भागातील रुग्ण उपचारासाठी येथे येत असतात. त्यामध्ये गरोदर माता व महिला रुग्णांचे प्रमाण लक्षणीय आहे.दरम्यान महिला भगिनींना. प्रसूतीदरम्यान किंवा महिलांच्या आरोग्याशी संबंधित आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास रुग्णांना जवळपास ९० किलोमीटर अंतरावरील नांदेड जिल्हा रुग्णालयात संदर्भित (रेफर) करावे लागते. या प्रदीर्घ प्रवासामुळे गरोदर माता व नवजात बालकांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता वाढते. परिणामी, महिला रुग्णांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

देगलूरसह सीमावर्ती ग्रामीण भागातील महिलांना वेळेत, सुरक्षित आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ५० खाटांचे स्वतंत्र स्त्री रुग्णालय उभारणे ही काळाची गरज असल्याचे आ. अंतापूरकर यांनी आरोग्य मंत्री यांच्या निदर्शनास आणून देत हा प्रस्ताव तातडीने मंजूर करून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली.

## युवा शक्तीला योग्य शिक्षण, कौशल्य विकास, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यास सर्वांगीण विकास होईल : डॉ. राजीव प्रधान

सोलापूर : (स. गांवकरी)




युवा शक्तीला योग्य शिक्षण, कौशल्य विकास, रोजगाराच्या संधी आणि उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करुन दिल्यास निश्चितच देशाचा सर्वांगीण विकास होईल असे विचार सोलापूर येथील नामवंत नेत्रतज्ञ डॉ. राजीव प्रधान यांनी केले.

भारतामध्ये तरुणांची संख्या मोठी असून हीच देशाची खरी ताकद आहे. या युवा शक्तीला योग्य शिक्षण, कौशल्य विकास, रोजगाराच्या संधी आणि उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्यास देशाचा सर्वांगीण विकास साधता येईल. लोकसंख्या नियंत्रणासाठी कुटुंब नियोजन, महिलांचे शिक्षण, महिला सक्षमीकरण, योग्य विवाहाचे वय, मातृ व बाल आरोग्य, लसीकरण, संतुलित आहार आणि प्रजनन आरोग्याविषयी जागरूकता अत्यंत आवश्यक आहे. समाजामध्ये अंधश्रद्धा, गैरसमज आणि चुकीच्या समजुती दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन डॉ. राजीव प्रधान यांनी केले.

ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया (एफपीए इंडिया), सोलापूर शाखा व ए.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त जनजागृतीपर प्रबोधन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बुर्ला महाविद्यालयाचे डॉ. शिवानंद भांजे हे होते. यावेळी व्यासपीठावर एफ. पी. ए. आय. सोलापूर शाखेचे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. अॅनी जॉन, युवाप्रतिनिधी ऐश्वर्या सावंत आदी उपस्थित होते . पुढे बोलताना डॉ. प्रधान म्हणाले की,११ जुलै हा दिवस केवळ लोकसंख्या वाढीचा विचार करण्यासाठी नसून, लोकसंख्येची गुणवत्ता, आरोग्य, शिक्षण आणि शाश्वत विकास यांचा विचार करण्याचा दिवस आहे. वाढती लोकसंख्या ही देशाच्या विकासासाठी संधी असली तरी तिचे योग्य नियोजन न झाल्यास अन्नसुरक्षा, पिण्याचे पाणी, ऊर्जा, आरोग्य सेवा, शिक्षण, रोजगार, निवारा आणि पर्यावरणावर मोठा ताण निर्माण होतो. त्यामुळे उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करणे आणि त्यांचे संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा. डॉ. शंकर राजे यांनी प्रास्ताविक करून जागतिक लोकसंख्या दिनाचे महत्त्व, उद्दिष्टे आणि कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. स्वागत कल्पना गडगडे यांनी केले. सूत्रसंचालन आकाश गायकवाड यांनी केले तर आभार ऐश्वर्या सावंत यांनी मानले.

कार्यक्रमास बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाचे कर्मचारी, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आमिर खान याच्या बद्धल सोशल मीडियावर हिंदू समजातून तीव्र संताप

सोलापूर : (स. गांवकरी)

आमिर खान हा वारंवार हिंदू मुलींशी लग्न करून तो या मुलीसोबत राहून मुलांना जन्म घालतो आणि नंतर या मुलीना सोडून देत घटस्फोट घेऊन पुन्हा दुसरे लग्न करतो. केवळ हिंदू मुलींशीच आमिरखान का लग्न करतो ? त्याला त्याच्या धर्मामधील मुली मिळत नाहीत का? असा प्रश्न उपस्थित करत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. आमिर खान याने अलीकडेच गौरी स्प्रॅटसोबत 5 जुलै रोजी तिसरे लग्न केले आहे हे तिसरे लग्न देखील हिंदू मुलीशीच केले आहे. त्याची तिसरी बायको ही हिंदू आहे. आमिर खान दुसऱ्या जातीचा आहे हे या हिंदू मुलीला माहिती असताना देखील तिने त्याच्याशी लग्न केले आहे. सर्व मुस्लिमांना हिंदू मुलींना स्त्रियांना बाटवण्याचं प्रशिक्षण आमिर खान देत असल्याच्या तीव्र प्रतिक्रिया हिंदू समाजांमधून व्यक्त केल्या जात आहेत. आमिर खान याच्या धर्माच्या पाठशाळेत म्हणून त्यांच्याकडून लाज लज्जा वगैरेची काही अपेक्षा राहिलेली नाही. जमलं तर आपल्या हिंदू मुला मुलींना आणि स्त्रियांना मुसलमानांच्या या चरित्रा बद्दल चांगली ओळख लवकरात लवकर करून देणे गरजेचे बनले आहे. आमिर खान हा केवळ आणि केवळ हा फक्त हिंदू मुलीशी लग्न करतो आणि घटस्फोट देतो.. बघा किती चालू आहे. मुस्लिम धर्मात चार लग्न करण्याची मुभा आहे त्याने कसे केले आता तीन झाल्या आता ह्या तिसरी ला घटस्फोट देताना तो चौथे लग्न पण हिंदू मुलीशीच करणार आणि मुस्लिम धर्मा प्रमाणे मी चार हिंदू बायका केल्या हे सिद्ध करणार आहे. गरीब मुसलमानाने किंवा गरीब हिंदू व्यक्तीने असे जर कृत्य केले असते तर? मोठी कारवाई यांच्यावर झाली असती. यात आमिर खान याची चूक नाही आपल्या हिंदू धर्मातील महिलाच आमिर खान याच्या कडे जाऊन राहू लागल्या असून त्याच्या सोबत प्रेम करू लागल्या आहेत.

# वारकऱ्यांसाठी 'आरोग्य भारती - चरण सेवा' उपक्रमाचे आयोजन

### पालखी सोहळ्यात पाहायला मिळाला फिजिओथेरपी, आरोग्य मार्गदर्शन व समाजसेवेचा अनोखा संगम

पुणे : (स. गांवकरी)



आषाढी वारीनिमित्त वारकरी भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, सूर्यदत्त कॉलेज ऑफ फार्मसी, हेल्थकेअर अँड रिसर्च आणि मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'आरोग्य भारती - चरण सेवा' या विशेष आरोग्य सेवा शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. पुण्यातील नाना पेठ येथे आयोजित या समाजोपयोगी उपक्रमात २५० हून अधिक वारकऱ्यांनी सेवा, आरोग्य तपासणी व मार्गदर्शनाचा लाभ घेतला. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या प्रेरणादायी नेतृत्वातून आणि त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना समाजसेवेची अनोखी मानवंदना म्हणून हा उपक्रम आयोजित करण्यात आला. 'संस्कार, संस्कृती आणि शिक्षण' या त्रिवेणीवर आधारित हा सेवा उपक्रम प्राचार्या डॉ. सिमी रेठरेकर व प्राचार्या डॉ. सारिका झांबड यांच्या पुढाकाराने राबविण्यात आला. आषाढी वारीदरम्यान शेकडो किलोमीटर पायी प्रवास करणाऱ्या वारकरी भाविकांना होणारा स्नायू व सांध्यांचा ताण, पायातील वेदना, थकवा आणि इतर शारीरिक त्रास लक्षात घेऊन कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी प्रा. डॉ. चैताली नेवे (पीटी), डॉ. आयझॅक साळवे (पीटी) आणि डॉ. अक्षता माने (पीटी) यांच्या मार्गदर्शनाखाली वारकऱ्यांची सखोल तपासणी करून आवश्यक फिजिओथेरपी उपचार दिले.

यामध्ये वेदनाशामक उपचार, सॉफ्ट टिश्यू व मायोफॅशियल रिलिज, जॉइंट मोबिलायझेशन, स्ट्रेचिंग व स्ट्रेंथनिंग व्यायाम, शरीरस्थिती सुधारणा, चालण्याचे प्रशिक्षण (गेट ट्रेनिंग), संतुलन व कार्यक्षमतेसाठी व्यायाम, आवश्यकतेनुसार किनेसिओ टेपिंग, घरच्या घरी करण्यासाठी व्यायाम, योग्य चालण्याबाबत मार्गदर्शन, दुखापत प्रतिबंधक उपाय तसेच किरकोळ स्नायू व सांध्यांच्या दुखापतींवरील प्रथमोपचार अशा विविध सेवा पुरविण्यात आल्या.

याचबरोबर सूर्यदत्त कॉलेज ऑफ फार्मसी, हेल्थकेअर अँड रिसर्चमधील पदवी व पदविका फार्मसी अभ्यासक्रमातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी वारकऱ्यांसाठी पायांची मालिश (फूट मसाज), प्राथमिक आरोग्य तपासणी, औषधोपचार, आरोग्य समुपदेशन, आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन तसेच इतर समाजोपयोगी सेवा दिल्या. या दोन्ही महाविद्यालयांच्या विद्यार्थी-शिक्षकांनी समन्वयाने दिलेल्या या सेवेमुळे वारकऱ्यांना शारीरिक थकवा व वेदनांपासून दिलासा मिळाला. दीर्घ पायी वारीदरम्यान आरोग्याची काळजी कशी घ्यावी, पायांची योग्य निगा कशी राखावी आणि दुखापतींपासून बचावासाठी कोणती खबरदारी घ्यावी याबाबतही उपयुक्त मार्गदर्शन करण्यात आले. या सेवाभावी उपक्रमाचे वारकरी भाविकांनी मनापासून स्वागत करत सूर्यदत्तच्या विद्यार्थी-शिक्षकांच्या सामाजिक बांधिलकीचे आणि मानवसेवेच्या भावनेचे कौतुक केले.

शिबिरात सहभागी झालेल्या वारकऱ्यांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत फिजिओथेरपी उपचार आणि आरोग्य सेवेमुळे मोठा दिलासा मिळाल्याची भावना व्यक्त केली.

# पुण्यात पालखी सोहळ्याला भक्तीचा महासागर






## वारकऱ्यांच्या सेवेत पुणेकर पुन्हा एकदा सरसावले!

पुणे : (स. गांवकरी)

आषाढी वारीनिमित्त आज पुण्यात मुक्काम असलेल्या जगद्गुरु संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या पालख्यांच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली. शहरातील विविध भागांत भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून "रामकृष्ण हरी" आणि "जय जय माऊली"च्या गजराने संपूर्ण पुणेनगरी दुमदुमून गेली. यंदाही पुणेकरांनी वारकऱ्यांच्या सेवेसाठी आपली परंपरा कायम राखली आहे. विशेषतः नाना पेठ परिसरात वारकऱ्यांचा आणि पालख्यांचा मोठ्या प्रमाणात मुक्काम असून, अनेक सामाजिक संस्था, मंडळे आणि नागरिकांनी वारकऱ्यांसाठी अन्नदान, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच निवासाची सोय केली आहे. वारकरी संप्रदायातील सर्वधर्मसमभाव, सेवा आणि भक्तीचा संदेश देणाऱ्या या वारीत सहभागी होण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक पुण्यात दाखल झाले आहेत. वारकऱ्यांच्या स्वागतासाठी पुणेकरांनी रस्त्यांवर गर्दी केली असून, अनेकांनी पालखीचे दर्शन घेऊन संतांच्या चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतले. भक्ती, सेवा आणि समतेचा संदेश देणाऱ्या या पालखी सोहळ्यामुळे पुणे शहराला पुन्हा एकदा आध्यात्मिक उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले असून, सर्वत्र भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळत आहे.



ठाणे : दिव्यात नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरात काही ठिकाणी खड्डे पडले असल्यामुळे व प्रशासनाचा दुर्लक्षितपणामुळे सदरचे खड्डे रिक्षा चालकांनी बुजवले. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...




### जगन्नाथ यात्रेनिमित्त पंचवटी पोलीस ठाण्यात नियोजन बैठक संपन्न

नाशिक (स. गांवकरी) : पंचवटी पोलिस ठाण्यात 16 जुलै रोजी निघणाऱ्या जगन्नाथ रथ यात्रे संदर्भात स्वीस्तर चर्चा करण्यात आली. आज पंचवटी पोलिस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजेंद्र पाटील यांच्या दालनात संपन्न झाली. यावेळी महंत भक्ती चरणदास महाराज सविस्तर माहिती दिली. यावेळी डॉ विलास पांगारकर, नागेश चव्हाण,रामसिंग बावरी, नरहरी उगलमुगले, सचिन लाटे, राहुल बर्वे, पत्रकार अमोल सोनवणे आदी सह पदाधिकारी उपस्थित होते.

### तलाठी हटवा, माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर शिंदे यांची मागणी

नवीन नांदेड (स. गांवकरी) : नांदेड तालुक्यातील धनेगाव येथील तलाठी सज्जाचे तलाठी डी.एस.सोनटके हे शेतीची व इतर कामे वेळेवर पुर्ण करीत नाहीत उलट ईतर कामासाठी पैशाची मागणी करत असुन या ठिकाणी तात्काळ नवीन तलाठयाची नेमणूक करण्याची मागणी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी व तहसीलदार नांदेड यांच्या कडे माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी केली आहे. नांदेड तालुक्यातील मौजे धनेगांव तलाठी सज्जा आहे. या सज्जा अंतर्गत बळीरामपूर ही ग्रामपंचायत आहे. एकूण दोन्ही ही ग्रामपंचायती धनेगांव, बळीरामपूर या गावाचा परिसर मोठा आहे,सज्जा अंतर्गत शेतीची 7/12 वर नोंद घेण्यासाठी लिंक रजिस्ट्री दिली. नियमानुसार कागदपत्रे दिले तरी शेतीची 7/12 वर नोंद घेण्यसाठी, फेर घेण्यासाठी 50,000/-(अक्षरी पन्नास हजार रुपये) तलाठी डी.एस. सोनटक्के हे मागणी करीत आहेत. वरील गावातील प्लॉट धारक जर प्लॉटची नोंद 7/12 वर घेण्यासाठी गेले असता त्यांना साधा प्लॉट 30X40 चा 7/12 उताऱ्यावर फेर घेण्यासाठी तलाठी डी. एस. सोनटक्के हे 25,000/- (पंचेवीस हजार रुपये) मागत आहेत. याही पलीकडे वारसा हक्काची नोंदीसाठी कुणी जर तलाठी ऑफीसला गेले तर त्यांनाही पैशाची मागणी होत आहे. तलाठी सज्जा धनेगांव येथील तलाठी सोनटक्के 7/12 नोंद, प्लॉटचा फेरफार, वारसा हक्क या सर्व बाबीसाठी अव्वाच्या सव्वा रुपयाची मागणी करणाऱ्या तलाठ्यांना तात्काळ हटवून नवीन तलाठी देण्याची मागणी केली आहे.

### चोरंबा ग्रामपंचायतीचा अजब कारभार

अर्धापूर (स. गांवकरी) : तालुक्यातील चोरंबा ग्रामपंचायतीचा अजब कारभार चव्हाट्यावर आला आहे.संगणक ऑपरेटरने एका निराधार विधवा वयोवृध्द महिलेच्या नावे असलेल्या मालकीच्या जागेच्या अभिलेख्यात खाडाखोड करून परस्पर हस्तांतरण केले असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. त्या जागेवर शासनाच्या घरकुल योजनेतून घराचे बांधकाम सुरु केले असल्यामुळे या महिलेनी पोलीसात तक्रार देवून न्यायाची मागणी केली आहे. नव्यानेच अर्धापूर तालुक्यात समावेश झालेल्या चोरंबा गावातील ग्रामपंचायतीने येथील वयोवृध्द निराधार दलित महिला धुरपताबाई रामा बहादुरे यांच्या मालकीच्या मालमत्ता क्रमांक २१० मधील जागेवर परस्पर अतिक्रमण करुन तेथे शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेमधून घरकूल बांधकाम सुरु केले असून यासाठी येथील ग्रामपंचायतीचे संगणक ऑपरेटर यांनी वयोवृध्द गरिब महिलेच्या अज्ञानपणाचा गैरफायदा घेऊन तिच्या परस्पर नमुना नं. - ८ अ मध्ये खाडाखोड करुन मालकीची जागा कमी करुन त्याच जागेवर घरकुल बांधकाम केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

### विशेष सखोल पुनर्निरीक्षणाला वेग; काम पूर्ण करणाऱ्या बीएलओचा गौरव



भोकर (स. गांवकरी) : विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रमांतर्गत भोकर तालुक्यात मतदार पडताळणीचे काम वेगाने सुरू असून आतापर्यंत एकूण १ लाख १४ हजार ८५६ मतदारांपैकी ५२ हजार २६९ गणना फॉर्मचे वितरण करण्यात आले आहे. त्यापैकी ३७ हजार ४६२ फॉर्मचे डिजिटायझेशन पूर्ण झाले असून, तालुक्यात सुमारे ३२.६२ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती निवडणूक विभागाने दिली. या मोहिमेत उत्कृष्ट कामगिरी करत मौजे पिंपळढव येथील भाग क्रमांक २४८ चे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) एल. के. वडमिले यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील १,३२७ मतदारांचे शंभर टक्के काम निर्धारित वेळेत पूर्ण केले. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी प्रवीण मेणशेट्टी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी विनोद गुंडमवार, मुख्याधिकारी, नगर परिषद भोकर ऋषभ पवार, नायब तहसीलदार (निवडणूक) रामेश्वर सावते, तसेच सर्व पर्यवेक्षक, ग्राम महसूल अधिकारी, निवडणूक विभागातील कर्मचारी जी. के. शेळके (सहाय्यक महसूल अधिकारी) आणि संजय सूर्यवंशी (संगणक चालक) यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनर्निरीक्षण वेळेत आणि अचूकरीत्या पूर्ण करण्यासाठी सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे, तसेच मतदारांनीही आवश्यक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून देत या मोहिमेस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

## शेलारी व म्हाडस शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप!



मुरबाड : (स. गांवकरी)

मुरबाड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा शेलारी व म्हाडस येथील विद्यार्थ्यांना नवी मुंबई, कोपरखैरणे येथील उद्योजक प्रकाश पाटील व सामाजिक कार्यकर्त्या प्रभावती पाटील यांच्या सौजन्याने तसेच त्यांच्या कन्या प्रतिभा पाटील यांच्या स्मरणार्थ वह्या, दप्तर, क्रीडा पोशाख आणि खाऊ वाटपाचा प्रेरणादायी उपक्रम नुकताच उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला शेलारी गावचे सरपंच नारायण बांगर, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा मोनिका भोईर, उपाध्यक्ष दिनेश विशे, सदस्या माया धनगर, म्हाडस गावच्या सरपंच वंदना म्हाडसे, सामाजिक कार्यकर्ते भरत दळवी, शेलारी शाळेचे शिक्षक सुनील भोईर तसेच म्हाडस शाळेचे शिक्षक बळीराम पवार यांच्यासह ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, चांगल्या सवयी आणि उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक असलेल्या मूल्यांविषयी मार्गदर्शन केले. उद्योजक प्रकाश पाटील यांनी विद्यार्थ्यांनी नियमित वाचन-लेखनाची सवय लावावी, मोबाईलच्या अतिरेकी वापरापासून दूर राहून शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन केले.

याचवेळी त्यांनी शेलारी जिल्हा परिषद शाळेच्या नवीन बांधकामासाठी व शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ती मदत करण्याची घोषणा केली. संपूर्ण गावाच्या सहकार्याने शाळेचा विकास करण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमादरम्यान भरत दळवी युवा विकास मंच, मुरबाड विधानसभा यांच्या वतीने शेलारी शाळेसाठी पाच ट्यूबलाईट संच देण्यात आले, तर म्हाडस शाळेसाठीही पाच ट्यूबलाईट संच देण्याची घोषणा करण्यात आली.

कार्यक्रमाच्या शेवटी दोन्ही गावांच्या सरपंचांनी उद्योजक प्रकाश पाटील व प्रभावती पाटील यांचे सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांसाठी केलेल्या या उपक्रमाबद्दल आभार मानले. काही विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त करून मिळालेल्या शैक्षणिक साहित्यामुळे अभ्यासासाठी अधिक प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त केली. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

## आय. एस. ऑडिट डेप्युटी मॅनेजरपदी सौरभ जाधव यांची निवड

कनाशी : (स. गांवकरी)



कळवण तालुक्यातील कनाशी गावासाठी अभिमानाची बाब. येथील होतकरू तरुण सौरभ महेश जाधव यांची देशातील सर्वात मोठी बँक असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये आय.एस. ऑडिट डेप्युटी मॅनेजर या प्रतिष्ठित पदावर निवड झाली आहे. त्यांना नवी मुंबई येथे रुजू होण्याचे आदेश मिळाले आहेत. सौरभ हे कनाशी येथील व्यापारी महेश जाधव यांचे सुपुत्र आहेत. अत्यंत सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या सौरभने जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवले आहे. सौरभ यांनी प्राथमिक शिक्षण कनाशी येथे तर पुढील शिक्षण कळवण येथे पूर्ण केले. उच्च शिक्षणासाठी त्यांनी पुणे येथील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे (COEP) या नामांकित संस्थेतून इन्फॉर्मेशन सिक्युरिटी या विषयात एम.टेक पदवी संपादन केली. उच्च शिक्षणानंतर त्यांनी पुणे येथील सी-डॅक या प्रतिष्ठित संस्थेत प्रकल्प अभियंता म्हणून काम करत सायबर सिक्युरिटी आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात मौल्यवान अनुभव मिळवला. बँकिंग क्षेत्रातील सायबर सुरक्षा आणि अंतर्गत लेखापरीक्षण हे आजच्या काळातील सर्वात महत्वाचे क्षेत्र आहे. या क्षेत्रातील तज्ञ म्हणून सौरभ यांची SBI मध्ये निवड झाली आहे. त्यांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा देशातील कोट्यवधी SBI खातेदारांना होणार आहे.

## तरुण ग्रामस्थांच्या दक्षतेने शहरातील गुन्हेगार पोलिसांच्या ताब्यात

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

अहिल्यानगर-कल्याण या राष्ट्रीय महामार्गावरील माळशेज घाट परिसरात कोळवाडी ता:- जुन्नर येथे रविवार दि:-१२ जुलै रोजी सकाळी चोरीच्या संशयाने मोठा गोंधळ उडाला संशयास्पद बोलेरो वाहनातून फिरणाऱ्या ५ जणांपैकी दोघांना ग्रामस्थांनी धाडसाने पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले तर हातात हत्यार बंद असल्याने त्यांचेसाथीदारांनी घटनास्थळा वरून पलायन केल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार,सोनु सिंग पापसिंग दुधानी वय:- ३५, रा:- हडपसर,पुणे व जिलूसिंग शेरसिंग दुधानी वय :-३८,रा:- खोपोली रायगड या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. संशयितांकडे असलेले एमएच १७ एजे ३०७५ क्रमांक बोलेरो वाहन हे अहिल्यानगर जिल्ह्या- तील राहुरी तालुक्यातील कोल्हार येथून चोरीला गेले असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.ही बोलेरो ओळखीची वाटल्याने स्थानिक नागरिक विघ्नेश घोलप यांनी कोळवाडीतील एका हॉटेल जवळ उभी असलेल्या वाहना बाबत चौकशी केली.वाहनाची चावी मागितल्यानंतर संशयित व घोलप यांच्यात वाद निर्माण झाला.वाद वाढताच काही संशयितांनी आपल्या जवळ असलेली हत्यारे बाहेर काढली परिणामी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. त्यांनी धाडस दाखवत एका संशयिताला घटनास्थळीच पकडले तर दुसऱ्याला शेजारील शेतात पाठलाग करून ताब्यात घेतले.त्यांच्या तीन साथीदारांनी गावठी कट्टे आणि इतर हत्यारे असल्यामुळे ग्रामस्थांना चकवा देत तेथून पळ काढला. संतप्त नागरिकांनी पकडलेल्या दोघांना मारहाण केल्याची माहिती मिळाली आहे. घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत दोघांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना प्राथमिक उपचारासाठी ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले.प्राथमिक चौकशीत ताब्या तील संशयितांवर राज्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.

## "स्वच्छ भारत अभियानाचा बोजवारा!

### भूमिगत गटारीवरच उभारले टॉयलेट शौचालय

- कनाशी ग्रामपंचायतीत नेमकं चाललंय तरी काय?
- "तक्रारींचा पाऊस, ग्रामविकास अधिकारी मात्र 'मूकदर्शक'
- नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा आरोप

नाशिक (कळवण) : (स. गांवकरी)



कळवण तालुक्यातील कनाशी ग्रामपंचायत हद्दीत स्वच्छ भारत अभियान आणि सार्वजनिक निधीतून उभारण्यात आलेल्या भूमिगत गटार योजनेची अक्षरशः खिल्ली उडाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गावातील एका लाभार्थ्याने थेट भूमिगत गटारीच्या चेंबरवरच शौचालय व बाथरूमचे बांधकाम केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला असून, यामुळे संपूर्ण गटार व्यवस्था धोक्यात आल्याचे सांगितले जात आहे.

सर्वात गंभीर बाब म्हणजे, या प्रकाराबाबत ग्रामपंचायतीकडे अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर संशयाचे ढग दाटले असून, ते नेमके कोणाच्या दबावाखाली काम करत आहेत का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

भूमिगत गटार ही सार्वजनिक मालमत्ता आहे. भविष्यात गटार चोकअप झाले, चेंबर उघडून दुरुस्ती करावी लागली किंवा गाळ-कचरा काढण्याची वेळ आली तर प्रशासन काय करणार? शौचालय पाडणार की संपूर्ण गावाला दुर्गंधी, घाण आणि आजारांच्या विळख्यात ढकलणार? हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. स्थानिकांच्या आरोपानुसार, शौचालयातील सांडपाण्याची व्यवस्था देखील वादग्रस्त असून, त्याचा त्रास शेजारील घराला सहन करावा लागू शकतो. त्यामुळे केवळ नियमांचे उल्लंघनच नव्हे, तर शेजाऱ्यांच्या हक्कांवरही गदा आल्याची भावना व्यक्त होत आहे.

गटार तुंबल्यास सांडपाणी रस्त्यावर येऊ शकते, डास, मच्छर, जंतू आणि विषाणूंचा प्रादुर्भाव वाढू शकतो. अशा परिस्थितीत नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी ग्राविकास अधिकारी घेणार का? ग्रामपंचायत घेणार का? की संबंधित लाभार्थी घेणार? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे देण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. शासन स्वच्छ भारत अभियानासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करत असताना, त्याच निधीतून उभारलेल्या सार्वजनिक सुविधांवर अतिक्रमण होत असेल आणि त्याकडे संबंधित अधिकारी डोळेझाक करत असतील, तर ही बाब अत्यंत गंभीर मानली जात आहे.

आता नागरिकांची मागणी स्पष्ट आहे—या संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करण्यात यावी, भूमिगत गटारीवरील अतिक्रमण हटवावे, नियमभंग करणाऱ्या संबंधित लाभार्थ्यावर कारवाई करावी आणि कर्तव्यात कसूर झाल्याचे आढळल्यास संबंधित ग्रामविकास अधिकारी व जबाबदार अधिकाऱ्यांवरही शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. सार्वजनिक निधी, सार्वजनिक सुविधा आणि नागरिकांचे आरोग्य यांच्याशी कोणालाही खेळ करण्याचा अधिकार नाही. आता प्रशासन जागे होणार की आणखी एखाद्या गंभीर दुर्घटनेची वाट पाहणार, याकडे संपूर्ण कनाशी ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.दरम्यान, या प्रकरणाबाबत माध्यमांनी ग्रामविकास अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, ग्रामविकास अधिकारी कनाशी त्यांनी दूरध्वनीवरून प्रतिक्रिया देताना संबंधित व्यक्तीस सोमवारी नोटीस बजावण्यात येणार असून नियमांनुसार पुढील आवश्यक कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

## सक्षमीकरणासाठी सर्व विभागांमध्ये प्रभावी समन्वयाची गरज

### राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर : महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक कार्यालयात महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्याचे निर्देश

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



महिलांना न्याय, सुरक्षा व सक्षमीकरण प्रभावीपणे सुनिश्चित करण्यासाठी महिला व बाल विकास, पोलीस, विधी सेवा प्राधिकरण, आरोग्य, महसूल, ग्रामविकास तसेच अन्य संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करणे आवश्यक आहे. कार्यस्थळी महिलांना सुरक्षित, सन्मानजनक व भेदभावमुक्त वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी पॉश (लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, 2013 अंतर्गत प्रत्येक शासकीय, निमशासकीय, खासगी तसेच असंघटित क्षेत्रातील आस्थापनांमध्ये अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीची स्थापना करून कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिले. पॉश ॲक्ट अंतर्गत तक्रार निवारण समिती न स्थापन केलेल्या शासकीय व खाजगी आस्थापना यांना दंड ठोठावण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित महिलाविषयक विविध विभागांच्या योजनांच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, विधी सेवा प्राधिकारणाचे सचिव शरद देशपांडे, स्वीय सहाय्यक संतोष कुलकर्णी, महिला बाल विकास विभागाचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी थोरात, महिला बाल विकास अधिकारी गणेश वाघ, विविध विभागाचे अधिकारी, समित्यांचे सदस्य आदीची उपस्थिती होती. यावेळी बोलताना विजया रहाटकर म्हणाल्या की, केंद्र व राज्य शासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना आणि कायदे लागू केले आहेत. महिलाविषयक योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व विभागांमध्ये समन्वय आवश्यक असून त्यांच्या अंमलबजावणीचे नियमित ऑडिट आणि डिजिटल मॉनिटरिंग केले गेले पाहिजे. महिलांना त्वरित न्याय मिळावा यासाठी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांनी त्रैमासिक संयुक्त आढावा बैठक घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

महिलांवरील अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये एफआयआर नोंदविणे, वेळेत आरोपपत्र दाखल करणे आणि पुढील कायदेशीर कार्यवाही प्रभावीपणे पूर्ण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पोलीस, संरक्षण अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुपदेशक, वन स्टॉप सेंटर, विधी सेवा प्राधिकरण आणि मानसोपचार सेवा यांच्यात सुसूत्र समन्वय असावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरुषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्वाचे



## कापूस उत्पादक शेतकरी पीक विम्याच्या प्रतीक्षेत

किनवट (स. गांवकरी) : खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत पीक विमा भरलेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अद्यापही विम्याची रक्कम मिळालेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. अतिवृष्टी व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे कापूस पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेक ठिकाणी पीक कापणी प्रयोगांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी उत्पादनाची नोंद झाल्याचे सांगितले जात असतानाही संबंधित विमा कंपनीकडून अद्याप नुकसानभरपाई जाहीर करण्यात आलेली नाही. याउलट, याच हंगामातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढला असून, समान निकषांवर कापूस उत्पादकांनाही तातडीने विमा मंजूर करावा, अशी मागणी जोर धरत आहे. राज्याच्या नुकत्याच पार पडलेल्या अधिवेशनात या महत्त्वाच्या विषयावर लोकप्रतिनिधींनी अपेक्षित पातळीवर आवाज उठवला नसल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. त्यामुळे कापूस उत्पादकांच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, तालुका प्रशासन व कृषी विभागाने सक्रिय भूमिका घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांनी तालुकाधिकारी, तालुका कृषी अधिकारी तसेच संबंधित महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी विमा कंपनीशी समन्वय साधून प्रलंबित दावे तातडीने निकाली काढण्यासाठी प्रभावी पाठपुरावा करावा, अशी मागणी केली आहे. नैसर्गिक संकटामुळे आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या कापूस उत्पादकांना पीक विम्याची रक्कम लवकरात लवकर मिळाल्यास त्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

## किनवट न्यायालयाचा निकाल; धनादेश अनादर प्रकरणात मुक्तता

किनवट (स. गांवकरी) : किनवट येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणात आरोपी वेंकट वेंकन्ना आडलकोंडावार यांची निर्दोष मुक्तता केली आहे. न्यायालयाने फिर्यादी जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्थेला धनादेशावरील रक्कम प्रत्यक्ष कायदेशीर देय असल्याचे सिद्ध करण्यात अपयश आल्याचे नमूद करत हा निकाल दिला. प्रकरणात पतसंस्थेने कर्जाची थकबाकी म्हणून ₹९०,४८१ रकमेचा धनादेश सादर केला होता. मात्र सुनावणीदरम्यान बचाव पक्षाने सादर केलेल्या युक्तिवादात पतसंस्थेच्या कर्ज खाते विवरणपत्रांमध्ये एकाच तारखेसाठी वेगवेगळ्या थकबाकीच्या रकमा नमूद असल्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच नोटीस व भेट खर्चाबाबत कोणताही ठोस पुरावा नसल्याचा मुद्दाही मांडण्यात आला. बचाव पक्षाचे वकील ॲड. उमेश श्रीकृष्ण घुले यांनी सहकार कायदा व उपलब्ध कागदपत्रांचा सखोल अभ्यास करून पतसंस्थेच्या दाव्यातील विसंगती न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. न्यायालयाने हा बचाव ग्राह्य धरत धनादेशावरील रक्कम कायदेशीर देय असल्याचे फिर्यादी सिद्ध करू शकली नसल्याने परक्राम्य लिखत अधिनियम, १८८१ च्या कलम १३८ अंतर्गत आरोपीची निर्दोष मुक्तता केली.



## 'डॉ. अण्णाभाऊ साठे गौरव पुरस्कार २०२६' मान्यवरांचा होणार सन्मान!

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती सोहळ्याचे औचित्य साधून, यंदाच्या 'साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे गौरव पुरस्कार २०२६' सोहळ्याचे आयोजन १ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले आहे. या पुरस्कारासाठी विविध क्षेत्रांतील समाजभूषणांची निवड करण्यासाठी 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती संयोजन समिती'ची एक महत्त्वपूर्ण बैठक १२ जुलै २०२६ रोजी स्थळ: डी. आर. टट्टू वसंत नगर, नांदेड येथे पार पडली. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैद्यकीय, साहित्य, कला, वाणिज्य, विज्ञान, उद्योग, देशसेवा आणि पत्रकारिता या क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय व दर्जेदार कार्य करणाऱ्या मान्यवरांना या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि ग्रंथ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या संपूर्ण सोहळ्याच्या पूर्वतयारीसाठी आणि नियोजनासाठी लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती संयोजन समितीच्या वतीने विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत व नियोजनात युवा साहित्यिक सोनू दरेगावकर, संजय गायकवाड, अंगद भालेराव, शिवाजी रेड्डी, लहुदास भालेराव, दत्तप्रसाद तालीमकर, ॲड. ज्ञानेश्वर सूर्यवंशी, विनोद पाचंगे आणि साहेबराव वाघमारे या समिती सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. पुरस्कार विजेत्यांची अधिकृत यादी समितीच्या वतीने येत्या १८ जुलै २०२६ रोजी जाहीर केली जाईल, अशी माहिती संयोजन समितीने दिली आहे.



ठाणे : दिवा शहरातील प्रभाग २७ मध्ये शिवसेना उपशहरप्रमुख तथा नगरसेवक ॲडो. आदेश भगत यांच्या निधीतून मुंबादेवी कॉलनी येथील रायझिंग चॅम्प स्कूल, अर्जुन स्कॅन सेंटर ते काळूबाई अपार्टमेंट येथील रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन नगरसेवक शैलेश पाटील, नगरसेविका सौ.दिपाली भगत यांच्या उपस्थितीत पार पडले. प्रसंगी विभागप्रमुख उमेश भगत, गुरुनाथ पाटील, भालचंद्र भगत, उपविभागप्रमुख संदेश भगत , शाखाप्रमुख रवींद्र परब, भरत शिंत्रे, उपशाखाप्रमुख जगदीश भोईर, नितीन चव्हाण, रितेश मोरे, स्थानिक नागरिक शशिकांत भोईर, रवींद्र भगत, प्रकाश कणसे, संतोष ताकवले, श्री भाने आदी कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. (फोटो - संतोष पडवळ)

# अवघ्या दोन महिन्यांतच सुनेने केले सुखी घराचे वाटोळे

- लग्नानंतर दोनच महिन्यात पत्नी म्हणाली मला सोडून दे'
- पत्नीच्या प्रेमसंबंधाला कंटाळून पतीने गळफास घेऊन जीवन संपविले



सोलापूर : (स. गांवकरी)

लग्न होऊन केवळ दोन महिनेच झाले होते या दोन महिन्यांत पत्नी नवऱ्या सोबत राहण्यास तयार नव्हती. लग्ना च्या अगोदर पासून पत्नीचे बाहेर एका मुलाशी प्रेमसंबंध होते . पत्नी सतत मला सोडून दे असा हट्ट नवऱ्या पाशी लावला होता पत्नीच्या या प्रेम संबंधाला कंटाळून केवळ दोन महिन्या पूर्वी लग्न झालेल्या मुलाने स्वतःच्या घरात गळफास घेऊन जीवन यात्रा संपविली आहे. ही घटना मोहोळ तालुक्यातील यावली या गावात घडली आहे. मुलीचा प्रियकर कोंडी येथील राहणारा आहे. कोंडी येथे राहणारा सौरभ शिंदे याला या प्रकरणात अटक करण्यात आली आहे. मोहोळ तालुक्यातील यावली येथे घडलेल्या घटनेने मोहोळ आणि उत्तर सोलापूर तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. पत्नी आणि तिच्या प्रियकराच्या प्रेमसंबंधांमुळे, तसेच पत्नीकडून होत असलेल्या मानसिक त्रासाला कंटाळून यावली (ता. मोहोळ) येथील २६ वर्षीय तरुण संजय राजाराम राऊत याने गळफास घेऊन जीवन संपविले. ही धक्कादायक घटना ८ जुलै. रोजी सकाळी उघडकीस आली आहे. या प्रकरणी मृताच्या वडिलांच्या तक्रारीवरून सुन आणि तिच्या प्रियकराविरुद्ध मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यावली येथील शेतकरी राजाराम नागनाथ राऊत यांचा मुलगा संजय याचे लग्न अवघ्या दोन महिन्यांपूर्वी, म्हणजेच १० मे २०२६ रोजी दहिटणे (ता. उत्तर सोलापूर) येथील नवनाथ ननवरे यांची मुलगी स्नेहल हिच्याशी झाले होते. परंतु, लग्नानंतर काही दिवसांतच कौटुंबिक कलह सुरू झाला. पत्नी स्नेहल ही पती संजयसोबत बोलत नव्हती आणि सतत रुसून बसायची. तिने संजयला पती म्हणून स्वीकारण्यास नकार दिला होता. व ती त्याला जवळ येऊ देत नव्हती. "माझे सौरभ शिंदे याच्यावर प्रेम आहे आणि मी त्याच्यासोबतच राहणार, तू मला सोडून दे," असे म्हणून ती संजयसोबत सतत भांडण करायची.

पत्नीच्या या वागणुकीमुळे आणि तिच्या प्रेमसंबंधांमुळे संजय प्रचंड मानसिक तणावाखाली होता व पूर्णपणे खचून गेला होता. अखेर ७ जुलैरोजी स्नेहल आणि तिचे सासरे दहिटणे येथे नातेवाईकांना भेटण्यासाठी गेले होते. तिथून परत आल्यानंतर रात्री सर्व कुटुंबीयांनी एकत्र जेवण केले आणि सर्वजण झोपायला गेले. संजयदेखील त्याच्या खोलीत झोपण्यासाठी गेला.

दुसऱ्या दिवशी, म्हणजेच ८ जुलै रोजी पहाटे ६ वाजेच्या सुमारास संजय झोपेतून उठला नाही. त्यामुळे त्याची आई त्याला उठवण्यासाठी खोलीत गेली असता, संजयने खोलीतील लोखंडी पाईपला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्याला तातडीने मोहोळ येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासणीपूर्वीच त्याला मृत घोषित केले.

या घटनेनंतर संजयचे वडील राजाराम राऊत यांनी पोलिसांत फिर्याद दिली. त्यानुसार पत्नी स्नेहल संजय राऊत आणि तिचा प्रियकर सौरभ सदाशिव शिंदे (रा. कोंडी, ता. उत्तर सोलापूर) या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास मोहोळ पोलीस करत आहेत.

## १५ जुलै रोजी गरजू विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप!

कर्जत : (स. गांवकरी)

आधार जनसेवा सामाजिक संस्था , कर्जत (जि. रायगड) यांच्या वतीने गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम बुधवार, दि. १५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ३ वाजता शासकीय आश्रमशाळा, डोळवली, ता. खालापूर, जि. रायगड येथे होणार आहे. आदरणीय डॉ. नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या सौजन्याने तसेच विविध सामाजिक कार्यकर्त्यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल आदी शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणावाला), महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे.राजेश शांतीलाल कोठारी, डॉ. एन. ए. कदम, ॲड. कैलास मोरे, , डॉ. विजय म्हसकर, डॉ. साबळे, सुनील चव्हाण, के. डी. पाटील, सुभाष पाटील, अजय बळीराम पिंगळे, सुदर्शन पाटील, डॉ. पाटील (सेंट्रल हॉस्पिटल, उल्हासनगर), मालती मुद्रलियार, दयानंद चतुर, पाटील सर, महादेव म्हात्रे, बापू गाडे, अल्पेश मोरे, प्रशांत खराडे, नरेश जाधव, देवेंद्र भारती आणि केशव घरत उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन आधार जनसेवा सामाजिक संस्थाचे संस्थापक अध्यक्ष गणेश कृष्णा कांबळे व उपाध्यक्ष संदीप गणेश पदसकर यांनी केले असून, परिसरातील नागरिक, पालक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे मालक यांचा ६६ वा वाढदिवस महाप्रसादालयात उत्साहात साजरा

अक्कलकोट : (स. गांवकरी)

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून संस्थेचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांचा ६६ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात महाप्रसादालयात साजरा करण्यात आला. दरम्यान उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या ६६ वा वाढदिवसा निमित्त कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी न्यासचे सचिव शामराव मोरे, पुरोहित विश्वंभर पुजारी, मनोज निकम, प्रवीण देशमुख, रोहित खोबरे, निखील पाटील, अतिश पवार, प्रवीण घाटगे, ज्ञानेश्वर भोसले, रोहन शिर्के, वैभव मोरे, सौरभ मोरे, बाळासाहेब पोळ, नामा भोसले,




कुमार सलबत्ते, दत्ता मोरे, दत्ता माने, शुभम सावंत, स्वामिनाथ गुरव, विराज माणिकशेट्टी, बाळासाहेब घाटगे, आकाश कडबगांवकर, संकेत पवार, किरण साठे, सागर जाधव, गणेश पवार, असद फुलारी, बाबुशा महिंद्रकर, सरफराज शेख, शहाजी यादव, समर्थ गाडगे, पिट्टू साठे, गोटू माने, मल्लिकार्जुन कोळी, शशिकांत कुंभार, यश विभूते, अमर पोतदार, अश्पाक काझी, मैनुद्दीन कोरबू, ॲड. फहीम पिरजादे, रुद्रय्या स्वामी, राहुल इंडे, मारुती बोरकर, काशिनाथ वाले, सतीश महिंद्रकर, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, महांतेश स्वामी, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते. अनेक मान्यवरांनी भ्रमणध्वनीच्या माध्यमातून उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या ६६ वा वाढदिवसा निमित्त शुभेच्छा दिले.

## 'राजमाता जिजाऊ' बसचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पुजन करून लोकार्पण



अक्कलकोट : (स. गांवकरी)

अक्कलकोट आगाराला नवीन ५ 'राजमाता जिजाऊ' बस देण्यात आल्या आहेत या नवीन राजमाता जिजाऊ बसेस चे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पुजन करून अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाकडून अक्कलकोट आगारास ५ नव्या 'राजमाता जिजाऊ' बस प्राप्त झाल्या असून, त्यांचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी अक्कलकोट आगारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सन्मान-सत्काराचा स्वीकार करून सर्वांचे अभिनंदन केले. अक्कलकोट शहरात श्री स्वामींच्या दर्शनासाठी राज्यभरातून लाखो भाविक येत असतात त्यामुळे प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि दर्जेदार प्रवासाची सुविधा मिळावी, हीच भूमिका होती. तसेच ग्रामीण भागातील वाहतूक अधिक सक्षम व्हावी आणि एसटी सेवा अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचावी, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. याच प्रयत्नांना यश मिळून अक्कलकोट आगाराला या नव्या आरामदायी बस उपलब्ध झाल्या आहेत. यामुळे विद्यार्थी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक, कामगार तसेच अक्कलकोटला येणाऱ्या भाविकांना निश्चितच मोठा लाभ होणार आहे. अक्कलकोटच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला बळकटी देणाऱ्या या निर्णयाबद्दल महाराष्ट्र शासन, परिवहन विभाग आणि एसटी महामंडळाचे मनःपूर्वक आभार मानतो.

अक्कलकोट बस आगार अधिक सक्षम करण्यासाठी माझा पाठपुरावा यापुढेही कायम राहील. या प्रसंगी आगार व्यवस्थापक श्री. सत्यशील खताळ, स्थानक प्रमुख श्री. नागेश रोडगे, कार्यशाळा अधीक्षक श्री. एम. के. पाटील, वाहतूक नियंत्रक श्री. तुकाराम शिंदे, पाळी प्रमुख श्री. सुनील जवळेकर, कर्मचारी श्री. राजू मुनाळे, श्री. गुरु गोडेन, श्री. अंबण्णा कोळी, श्री. अभि काळे, श्री. वसंत बंडगर, श्री. निवृत्ती वेरूळकर, श्री. सिद्धाराम चौगुले, यांच्या सह सेवा निवृत वाहतूक नियंत्रक श्रीमंत खसकी आदी तसेच कर्मचारी, चालक, वाहक उपस्थित होते.

## एस आय आर मोहीमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

नवीन नांदेड : (स. गांवकरी)

कौठा प्रभाग विकास समितीच्या वतीने बालाजी मंदिर कौठा घेण्यात आलेल्या एसआयआर मोहीमेला मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, यावेळी महसूल प्रशासनाचे उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ यांच्या सह प्रभागातील माजी नगरसेवक राजू पाटील काळे, नगरसेवक प्रतिनिधी गणेश काकडे यांची उपस्थिती होती. दि.12 जुलै रोजी जुना कौठा येथील प्रभाग क्रमांक 19 चा वतीने बालाजी मंदिर विकास नगर येथे एस आय आर अंतर्गत मतदार नोंदणी शिबिर घेण्यात आला. या वेळी उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ, सहाय्यक मतदान नोंदणी अधिकारी अविनाश शिंगारे, मनपा सिडको क्षेत्रीय अधिकारी डॉ. मिर्झा बेग,नगरसेवक प्रतिनिधी गणेश धोंडीबाराव काकडे,माजी नगरसेवक राजू पाटील काळे,गंगा भीषण कांकर,शितल खांडील, लक्ष्मीकांत मुकावार,अशोक दिलेराव,विनोद काकडे, सचिन कासटवार, यांच्या सह नागरिक उपस्थित होते. कौठा वार्ड विकास समितीचे विनोद काकडे, बाबाराव ईबितवार, उध्दव बसवदे,उत्तम वरपडे, गोविंद शर्मा यांनी विशेष परिश्रम घेऊन ही मोहीम यशस्वी केली.

## सोलापुरात आढावा बैठकीला अधिकारी उशिरा आले

सोलापूर : (स. गांवकरी)



- उद्योग मंत्री उदय सामंत यांनी जिल्हाधिकारी, आणि एसपी यांची केली कानउघाडणी

सोलापुरातील आढावा बैठकीसाठी जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक वेळेत उपस्थित न राहिल्याने उद्योगमंत्री उदय सामंत नाराज झाल्यानंतर त्यांनी प्रोटोकॉलच्या मुद्द्यावरून वरिष्ठ अधिकाऱ्यांची बंद खोलीत कानउघाडणी केल्याची माहिती समोर आली आहे. सोलापुरात आढावा बैठकीला अधिकारी उशिरा पोहचले; यामुळे उद्योग मंत्री उदय सामंत यांचा पारा चढला आणि त्यांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांची चांगलीच खरडपट्टी केली. इतकेच नाही तर उदय सामंतांनी जिल्हाधिकारी, एसपीं यांची कानउघाडणी करत मीच तुमच्या कार्यालयात शिवसैनिकांना घेऊन येतो असेही म्हटले.

सोलापूर, शहर: जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीसाठी जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक वेळेत उपस्थित न राहिल्याने उद्योगमंत्री उदय सामंत यांनी नाराजी व्यक्त केल्याची चर्चा प्रशासकीय वर्तुळात रंगली आहे. प्रोटोकॉलचे पालन न झाल्याच्या मुद्द्यावरून दोन्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांची शासकीय विश्रामगृहात बंद खोलीत कानउघाडणी केल्याची माहिती समोर येत आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या सोलापूर दौऱ्यादरम्यान जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली. त्यानंतर उद्योग विभागाशी संबंधित विविध विषयांचा आढावा घेण्यासाठी स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात आली होती.

अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार ही बैठक नियोजन समितीच्या बैठकीनंतर घेण्यात यावी, असे निश्चित झाल्याने सामंत यांनी आपल्या पूर्वनियोजित कार्यक्रमात बदल करून बैठकीची वेळ पुढे ढकलली होती.

# डॉ. श्री. धर्माधिकारी प्रतिष्ठानच्यावतीने ३०६ झाडांचे वृक्षारोपण

### ४११ सेवेकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग; 'एक वृक्ष, एक जबाबदारी'चा दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

भिवंडी : (स. गांवकरी)

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या, रेवदंडा ता. अलिबाग व रायगड यांच्या सौजन्याने वृक्ष लागवड व संवर्धन अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रविवारी भिवंडी तालुक्यातील कुरुंद ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय ते दलेपाडा प्रवेशद्वार या परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला. या कार्यक्रमास पडघा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रवींद्र विशे, भिवंडी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती डॉ. संजय पाटील तसेच खालिंग ग्रामपंचायतीचे सरपंच राजाराम शेलार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर




या उपक्रमात भिवंडी तालुक्यातील वाफाळे,पडघा, वडवली, वांद्रे, भरे, सावद, जानवळ ,निंबवली,अनगाव येथील बैठकांमधील सदस्य उपस्थित होते.तर मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या अभियानात प्रतिष्ठानचे ४११ सेवेकरी सहभागी झाले. त्यांच्या सामूहिक श्रमातून ३०६ विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. रस्त्यालगत आणि सार्वजनिक परिसर हिरवागार करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे नागरिकांनी मनापासून स्वागत केले. 'एक वृक्ष, एक जबाबदारी' हा संदेश समाजापर्यंत पोहोचविताना केवळ वृक्ष लागवडच नव्हे, तर लावलेल्या प्रत्येक रोपाचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्पही सेवेकऱ्यांनी केला.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि भावी पिढ्यांना हरित वारसा देण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

पर्यावरण रक्षणासाठी सामाजिक बांधिलकी जपत डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानने राबविलेला हा उपक्रम परिसरातील नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरला असून, भविष्यातही अशाच लोकसहभागातून हरित अभियान अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.